
HUM
TUM
अनाथालय को
वृद्धाश्रम से मिलाए
करा विचार
ॲड. रुपेश पवार

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

लेखसंग्रह

# करा विचार

## लेखक : अॅड. रुपेश पवार

# करा विचार


## लेखक : ॲड. रुपेश पवार

पत्ता: ठाणे

मोबाईल : 9930852165

ई मेल : rupesh.b.pawar@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

Whatsapp: 9987737237

esahity@gmail.com

प्रकाशन : ६ जून २०२२ शिवस्वराज्याभिषेकदिन

©esahity Pratishthan®2022

ई साहित्य प्रतिष्ठान हे एक मुक्त विचार व्यासपीठ आहे. या पुस्तकात मांडलेले विचार हे त्या लेखकाचे असून सर्वच विचारांशी/ मतांशी/ संशोधनाशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कलामय ओळख




माझे मित्र साहित्यिक पत्रकार ॲड रुपेश बी पवार ठाण्यात गेल्या वीस वर्षापासून ते साहित्य, पत्रकारिता क्षेत्रात कार्य करतात. यांनी पाचशेहून अधिक ललित लेखांचे तसेच चारशेहून अधिक कवितांचे लेखन केले आहे. या लेखनातून आत्तापर्यंत रुपेशजींनी पाच पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात दोन काव्यसंग्रह, एक ललित संग्रह, एक कथासंग्रह आणि एक संपादकीय लेखसंग्रह प्रकाशित केले आहेत. एक सामाजिक, कौटुंबिक नाटक रुपेश पवार यांनी लिहिले आहे. त्याचप्रमाणे ते गेल्या पाच वर्षांपासून चित्रपट कथा, गीतलेखन करत आहेत. या अष्टपैलू कार्यामुळे रुपेशजींना आतापर्यंत ३० पुरस्कार लाभले आहेत. झी २४ तासने या कार्याची दखल घेऊन रुपेश यांना मुलाखती करता निमंत्रित केले होते. ते अस्थिव्यंग या प्रकाराने अपंग आहेत. २०१३, १४ पासून मी रुपेश यांना ओळखत आहे. ते विविध साहित्यिक कार्यक्रमांचे संयोजन करतात, अनेक कार्यक्रमात रुपेशजींचा सहभाग असतो.

त्यांची पुस्तके पुढील प्रमाणे नशा, अंतरंग काव्यसंग्रह, वलयांकित ललित संग्रह, मनोगाथा कथासंग्रह, प्रतिभावंतांच्या रंगसावल्या संपादन संग्रह आणि आता प्रकाशित झालेला चिंतनातील विचार, अशा सहा साहित्य कलाकृती रुपेश पवार यांच्या नावावर आहेत.

साहित्यिक, समाजसेवक

राजेंद्र मधुकर सावंत

+918693012316

# अ‍ॅडवोकेट रुपेश पवार यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके






# अर्पण पत्रिका

छत्रपतींच्या चरणी
सादर अर्पण
आपल्या सभोवताली
काय घडते काय नाही
याचा आरसा हे पुस्तक आहे
असे आरसे समाजात तयार व्हावे
हा माझा प्रयत्न वाचकांनी जाणून घ्यावा
म्हणून हे विचार मी आपल्यासमोर ठेवतो आहे
दिशा मिळावी परिवर्तनाला, ही माझी धारणा आहे
प्रणाम करतो राष्ट्र संतांना, नतमस्तक होऊन मी

**ॲड. रुपेश पवार**

# प्रस्तावना :- चिंतनशील लेखक

ॲड. श्री रुपेश पवार यांनी सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयांची,समस्यांची उकल वेगवेगळ्या घटनांचे अवलोकन आणि सूक्ष्म अभ्यास करून 'करा विचार ' हे पुस्तक लिहिले आहे. श्री रुपेश पवार हे खऱ्या अर्थाने एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा जीवन प्रवास अनेक अव्हानाने आणि खडतर प्रसंगाची कहाणी सांगणारा असा आहे. सामाजिक प्रश्न आणि सामाजिक जाणीव याकडे एक वेगळ्या दृष्टीने बघण्याची आणि सक्षमतेने ते माडण्याची विशेष पात्रता त्यांच्यात आहे हे या पुस्तकात उल्लेख केलेल्या घटना,प्रसंग यावरून दिसून येते.

सामाजिक विषमता ही प्रामुख्याने जात, धर्म आणि लिंग या तीन घटकावर आधारित आहे आणि त्यातील महत्वाचा घटक म्हणजे स्त्री आहे. ही सामाजिक विषमता केवळ सामाजिक स्तरावर न राहता सगळ्याच क्षेत्रात दिसून येते. याची अनेक कारणे आहेत पण निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा समावेश नसणे हे महत्वाचे कारण समोर येते.

गेल्या अनेक वर्षात स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण कमी न होता वाढत चालले आहे. प्रत्यक्षात सरकारी आणि सामाजिक संस्थांनी स्त्री अत्याचाराची जी आकडेवारी उपलब्ध करून दिली आहे, ती पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष नोंद होणाऱ्या तक्रारीवरून दिली आहे. परंतु नोंद होणाऱ्या घटनांपेक्षाही अनेक कारणांमुळे अंधारात

राहणाऱ्या घटनांची संख्या निश्चितच जास्त असणार. स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी प्रभावी कायदे आणि त्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहेच, परंतु त्याबरोबर आवश्य आहे ती जनजागृती. स्त्रियां/मुलींना मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जासंदर्भात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरवीकरण व दुसऱ्या बाजूला समाजात मात्र प्रत्यक्षात दुय्यम स्थान आणि सर्व स्तरावरील शोषण असा हा विरोधाभास आहे.

स्त्रियांच्या संदर्भात घडणारे अनेक प्रसंग आणि घटना याचा उल्लेख करत श्री रुपेश पवार यांनी सामाजिक प्रश्नाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन आपल्या पुढे ठेवला आहे. त्यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून अनाथांच्या समस्या, वृद्धांच्या समस्या अश्या अनेक सामाजिक विषयावर आपली संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव व्यक्त केली आहे.

श्री रुपेश पवार यांचे मनपूर्वक अभिनंदन आणि पुढील यशस्वी साहित्य प्रवासासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा. आई सरस्वतीचा वरदहस्त त्यांना कायम लाभू दे हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

डॉ राणी दुष्यंत खेडीकर
समुपदेशक, महाराष्ट्र

# अनमोल विचार

'करा विचार' या लेख संग्रहाच्या निमित्ताने मी रुपेश पवार आपल्याशी संवाद साधतो आहे. लेखक या नात्याने २०२१ पासून मी 'ठाणेवैभव' वृत्तपत्रात सदर लेख मालिकांचे' लेखन करतो आहे. या आधी मी स्तंभलेखक म्हणून वीस वर्षात 'ठाणेवैभव' वृत्तपत्रात लेख मालिकांचे लेखन केले नव्हते. कारण सतत मला प्रासंगिक लेख लिहिण्याची आवड होती. प्रासंगिक लेखातून रोज घडणाऱ्या एखाद्या संवेदनशील विषयावर लेख लिहून, वाचकांशी छान संवाद साधता येतो. त्यातून वाचकांसमोर नवीन विषय येत असतो. या विषयातून कळत नकळत विचार परिवर्तन होत असते. म्हणून लेखकाने उत्तमातील उत्तम विषय अभ्यासपूर्वक, संवेदनशीलतेने मांडावेत. हा आग्रह माझा कायम राहिला आहे. त्यामुळे दैनिक ठाणेवैभवचे संपादक श्री मिलिंद बल्लाळ यांनी माझ्या प्रत्येक लेखाला नेहमी महत्वाचे स्थान दिले.

परंतु २०२१ ला आपल्या लिखाणात काहीतरी नवीन प्रयोग करायचा. म्हणून मी कथा सदर सुरू केले. एका सदरातून दुसरे सदर लिहीत असताना, नवे नवे विषय माझ्यासमोर सहज सोप्या रीतीने येत गेले. आपल्या सर्वांना माहित आहे, 'ई-साहित्य प्रतिष्ठानने' एक मे २०२२ रोजी माझे इतिहास विषयक लेखांचे 'चिंतनातील विचार' हे सहावे पुस्तक प्रकाशित केले. तो ही एक सदर लेख मालिकेच्या लिखाणाचा भाग होता. हे सदर ठाणेवैभवमध्ये लिहून पूर्ण

झाल्यावर नवीन विषयाच्या शोधात असताना, 'करा विचार' या नावाने एक नवे लेख मालिका सदर आकाराला आले. यात मी समाजातील काही. समस्यांना, प्रश्नांना मांडण्याचा प्रामाणिकतेने प्रयत्न केला. अनेक संवेदनशील मुद्द्यांना मी स्पर्श केला आहे. त्यातून वाचकांना आपण सर्वांनी विचार करावा असे सांगितले आहे! 'आपण सर्वांनी' या शब्दात स्वतः लेखक म्हणून मी ही येतो. कारण हे विषय लिहून मला बाजूला होता येणार नाही. शेवटी एका विचारातून दुसरा विचार निर्माण होतो. या प्रक्रियेतूनच काही समस्यांना उत्तर मिळते. म्हणून आपण सर्वांनी मिळून या सामाजिक समस्यांचे उत्तर शोधायला हवे, तरच आपण समस्येच्या गर्तेतून बाहेर पडू शकतो.

यात आपण एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे. आपण आपल्या भारत देशाचे नागरिक आहोत. त्यामुळे शेवटच्या श्वासापर्यंत आपण राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन, आपल्या सामाजिक समस्यांचा विचार केला पाहिजे. मग आपला वैयक्तिक धर्म कोणताही असो, त्याचा फारसा विचार न करता. आपण आपल्या भारतीय राज्यघटनेशी एकनिष्ठ असायला हवे. सामाजिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात ज्या व्यक्ती कार्य करतात. त्या व्यक्ती कोणत्या धर्माच्या आहेत, कोणत्या जातीच्या आहेत. या गोष्टींना महत्त्व न देता, तो व्यक्ती भारतीय आहे आणि त्याला संवेदनशील होऊन सच्चेपणाने लोककार्य करायचे आहे. याचाच फक्त विचार भारतीय नागरिक म्हणून आपण करायला हवा. म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करताना, आपण राज्यघटनेतील सर्व धर्म समभाव आणि

समान नागरी कायदा अशा प्रकारच्या अनेक राज्यघटनेतील तत्वांचा सन्मान केलाच पाहिजे. कारण आपल्या व्यक्तिगत  विचारापेक्षा, धर्म, जातीपेक्षा भारतीय नागरिकत्व  महत्वाचे आहे, ते नागरिकत्व आपल्या सर्वांना राज्यघटनेने बहाल केले आहे. अशी माझी राष्ट्रीय धरण आहे.

या विचारातून मी ह्या पुस्तकातील लेखांची मांडणी केली आहे. त्यात स्त्रिच अस्तित्व, तिच्या मनातील

एकरूप भावनेचे प्रेम, तिचा सामाजिक आत्मसन्मान या विषयावर काही लेख आहेत तसेच विवाहसंस्थेचे सामाजिक पातळीवरील बदलते स्वरूप, वैवाहिक नात्यांमध्ये झालेला बदल, कौटुंबिक जिव्हाळा आणि त्यातील पडझड, समाजात वाढत जाणारे वृद्धाश्रम व त्या संदर्भातील परियायी संकल्पना असेही काही लेख यात आहेत त्याचबरोबर आपल्या राष्ट्रीय तिरंगी झेंड्याचा सन्मान, राज्यघटनेच्या तत्वांचे पालन, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर व आपले खरे नागरिकत्व  यांचाही समावेश या पुस्तकात आहे. शेवटच्या दोन विषयातील एका लेखात वाचन संस्कृतीबद्दल लिहिले आहे तर दुसऱ्या लेखात पावसाचा आनंद घेताना प्रत्येक वयात उमटणारी मनोभावना. या सर्वातून 'करा विचार' हे पुस्तक विविधांगी विषयांचे झाले आहे, ते आपल्याला आवडेल असे मला विश्वासाने वाटते आहे.

'करा विचार' हे पुस्तक इ साहित्य प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा आणि प्रकाशक नाम काका यांनी प्रकाशनाला घेऊन, मला पुन्हा सहकार्य केले आहे. इ साहित्य

प्रतिष्ठानचा लेखक परिवार खूप मोठा आहे. त्यामुळे या साहित्य प्रतिष्ठानवर दर महिन्याला निरनिराळ्या विषयांवर अनेक पुस्तके प्रकाशित होत असतात. त्या प्रकाशन मालिकेमध्ये माझाही समावेश कायम होतो आहे. या बद्दल मी फार समाधानी आहे. कारण लाखो वाचकांपर्यंत . इ साहित्य प्रतिष्ठांनची पुस्तके जात असतात. त्यामुळे नवनवीन साहित्यिक माय मराठीला मिळाले आहेत. यामुळे वाचकांना विविधांगी लेखन वाचावयास  मिळते. या माझ्या पुस्तकात अशाच प्रकारचे वेगवेगळे लेख आहेत, ते आपल्या पसंतीला  उतरतील. माझे हे पुस्तक वाचल्यावर सर्व वाचकांनी  मला Whatsapp अभिप्राय द्यावा आणि आपल्या मनात येणारा एखादा विषय मला सांगावा. म्हणजे मी माझ्या पुढील सदरात अशा विषयांवर लेख लिहिन, त्यातून पुढे एक नवी साहित्य कलाकृती निर्माण होईल. मी परत एकदा सर्व वाचकांचे आणि प्रकाशक नाम काकांचे आभार मानतो.

**"विचार परिवर्तन एक ध्यास"**.

**ॲड.रुपेश पवार (**9930852165)

**इतिहास अभ्यासक**

# करा विचार : अनुक्रमणिका

१) एक जीवन प्रवास

२) आपले राष्ट्रीय सण

३) विवाहसंस्थेचे बदलते स्वरूप

४) ' हे कसले परिवर्तन, हे तर अवर्तन '

५) कवयित्री शांता शेळके यांची अनमोल पैठणी

६) माणसातील समाज जीवन

७) महाराष्ट्राचे राजकारण आणि हिंदुत्व

८) शेतकरी बंधूंनी करावा निर्धार

९) आरसा स्त्री जीवनाचा

१०) लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

११) स्त्री जीवन काल आणि आज

१२) मुलं असणाऱ्या पालकांनी अधिक सजक रहावे

१३) वाचन संस्कृती आणि समाजमाध्यमे

१४) एक पावसाळी शब्दांकित सहल

# १) एक जीवन प्रवास



मित्रांनो या लेखात मी एक घटना आपल्यासमोर आणली आहे. अशा प्रकारच्या अनेक घटना आपल्या आसपास घडत असतात. त्याकडे आपण नेहमीच दुर्लक्ष करतो. संवेदनशीलतेने आपण त्या घटनेचा विचार करत नाही. म्हणून मी ही गोष्ट माझ्या लेखात रंगवली आहे. त्यामुळे हा लेख आपण जरुर वाचावा.

प्रेम हा जीवनाचा सुंदर प्रवास आहे. या प्रवासात माणूस स्वतःला विसरुन, एकमेकांच्या प्रेमात आपल्याला शोधू लागतो. हा शोध जेव्हा पूर्ण

होतो तेव्हा त्या दोघांच्या अंतरंगात प्रेमाचा गुलमोहर फुलू लागतो. त्यांच्या प्रेम जीवनात मोगऱ्याचा सुगंध दरवळतो. असा हा प्रेमाचा सुंदर सहवास असतो. असे प्रेम प्रत्येकाला अनुभवता येत नाही. कारण प्रत्येकाचे आयुष्य सारखे नसते. त्यामुळे या प्रेमात काही विपरीतही घडू शकते. हाच अनुभव मी आज आपल्या पुढे कथन करणार आहे.

एका गावात एक लेखक व्याख्यानाच्या निमित्ताने जात असतो. वाटेत त्याची एस टी बस थांबते. तो चहा घेण्यासाठी खाली उतरतो. चहा घेताना त्याचे एका मुलीकडे लक्ष जाते. ती मुलगी तरुण, सुंदर असते पण तिचे केस विस्कटलेले असतात. अंगावरचे जुने झालेले कपडे फाटलेले असतात. ती वेडी मुलगी दिसेल त्याच्याशी बोलत असते. त्या सर्वांच्या डोळ्यात तिच्याबद्दल एक आपुलकीचा भाव असतो. ते पाहून लेखक विचारात पडतो. तेवढ्यात त्याच्या कपातला चहा संपलेला असतो. तो पुन्हा बसमध्ये चढतो, आपल्या सीटवर जाऊन बसतो. बाजूचा प्रवासी त्याच्याशी बोलू लागतो. लेखक आता त्या वेड्या मुलीचा विषय काढतो.

त्यावेळी लेखक म्हणतो, हल्ली कुणाचे काही सांगता येत नाही. वासनेचे भुकेले गल्लोगल्ली फिरत आहेत. त्यात ही मुलगी रस्त्यावर

बेवारस पडलेली. हा संवाद सुरु असताना एक प्रवासी बाई लेखकाला सांगू लागते. ही मुलगी निर्विकार होऊन पार वेडी झाली आहे. तिचे आता बरेवाईट काय होणार, तिच्या प्रयकाराने तिला आधीच ओरबाडले आहे. त्यावर तो लेखक तिची कर्म कहाणी त्या बाईंकडून जाणून घोतो.

या वेड्या मुलीचे एका मुलावर प्रेम असते. तो

मुलगा कामा निमित्ताने सतत या गावात येत असतो. या मुलीला तो गुलाबी स्वप्न दाखवतो. तिचे गरीब आई वडील त्यांच्या लग्नाला होकार देतात पण हा मुलगा आज उद्या करत या लग्नाला टाळत जातो. त्यावेळी तो या "वेड्या मुलीला विश्वासात घेतो. तिच्या तनामनाशी अक्षरशः खेळतो. काही दिवसानंतर तो या गावात येत नाही. लग्न करुन तो मोकळा होतो. ही मुलगी त्याला फोन करते. त्यावेळी हा मुलगा तिच्याशी बोलतो. आमच्याकडे लग्ना आधी प्रेम केलेल्या मुलीशी कुणीच लग्न करत नाही. असे म्हणत तो निर्दयपणे फोन कट करतो. हे ऐकल्यावर ती मुलगी सुन्न होते. त्यातच तिला वेड लागते. मग तीन मुलींच्या लग्नाचे ओझे वागवणारे गरीब आई बाप, आपल्या वेड्या मुली सोडून, दूर एका गावी निघून जातात. म्हणून ही वेडी मुलगी येथे येऊन, त्यांची चौकशी करते आणि रात्री देवळात जाऊन झोपते.

अशा वेळी लेखकाच्या मनात एक विचार येतो. त्यात तो म्हणतो, बरं झालं ही मुलगी वेडी झाली. नाहीतर या समाजाने तिला टोचून खाल्ले असते. मग ही मुलगी नको त्या वस्तीत गेली असती पण आज हा समाज तिच्यावर दया दाखवतोय. ही सर्वात मोठी गोष्ट आहे पण प्रेम हे असे असू शकते? यावर विश्वास बसत नाही. त्यावेळी लेखक म्हणतो, हा प्रेमाचा खेळ नाही, तर तो केवळ उपभोग आहे. यात एका मुलीचे आयुष्य बरबाद झाले.

म्हणून मित्रांनो मी सुरुवातीला म्हणालो होतो. प्रत्येकाचे आयुष्य सारखे नसते. प्रेमात विपरीत सुद्धा काही घडू शकते. हा प्रसंग आपल्याला हेच सांगतो. याकरता आपण जीवनात सावधान राहिले पाहिजे.

# २) आपले राष्ट्रीय सण



दरवर्षी आपण झेंडावंदन करतो, झेंड्याला आपण सलामी देतो. ही सलामी दिल्यावर आपण आपल्या देशाला विचारतो आणि आपल्या तिरंगी कागदी झेंड्याला, रस्त्यावर सोडून निघून जातो. हे कृत्य वेदनादायी आहे. म्हणून मी झेंड्याच्या सन्मानार्थ हा लेख लिहिला आहे. तो आपण वाचावा व 365 दिवस देशभक्तीपर भावनेतून सर्वांनी या तिरंगी झेंड्याचा सन्मान ठेवावा.

मित्रांनो आपण आपल्या भारत देशाचा सन्मान करतो. म्हणून आपण आपल्या राज्यघटनेनुसार नागरिकत्वाचे नियम पाळतो. सर्व जाती, धर्म, भाषा, संस्कृतींचा मान राखतो. आपल्या देशावर संकट आल्यावर आपण मनाने हळहळतो. लगेच मदतीचा हात पुढे करतो. विशेष सभा घेऊन त्या वाईट गोष्टीवर निषेध व्यक्त करतो. हे सार आपण आपल्या भारतासाठी करतो.

या भारताचा २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सण जेव्हा येतो तेव्हा या सणा निमित्ताने आपण शहरातील, गावातील चौकाचौकात आपला तिरंगा ध्वज उभारून, त्यास मानवंदना देतो. त्यावेळी समाजसेवक, राजकीय कार्यकर्ते, साहित्यिक आणि पत्रकार आपल्या ध्वजाला सलामी देऊन विधायक भाषणे करतात. या कार्यक्रमात सर्वांच्या हातात कागदी तिरंगे झेंडे असतात. लहान मुले या दिवशी देशभक्तीपर कार्यक्रम साजरे करतात. हा राष्ट्रीय समारंभ संपन्न झाल्यावर लहान मुलांना चॉकलेटांचे वाटप केले जाते. त्यावेळी मनात देशभक्तीचे चैतन्यदायी वातावरण तयार होते.

पण हल्लीच्या काळात तसे होताना दिसत नाही. लोक ध्वजावंदनाला बाहेर पडत नाहीत. सार्वजनिक रजेचे निमित्त काढून आदल्या दिवशी रात्री पिकनिकचे आयोजन केले जाते. देशभरात काही राजकीय मंडळी आणि जानकर नागरिक सर्व लोकांना घेऊन ध्वजावंदनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने करत असतात पण बहुसंख्य नागरिक या कार्यक्रमाला हजर राहत नाहीत. कारण ते पिकनिकला जाऊन, पर्यटन स्थळाचा मनसोक्त आनंद घेत असतात. त्यांना देशाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात इंटरेस्ट नसतो. दोन, तीन दिवसाचा हॉलिडे आहे. तो आपण एन्जॉय करूया असा विचार त्यांच्या मनात येतो. मग हे वेडे पर्यटक या राष्ट्रीय सणांकडे दुर्लक्ष करतात. हा सर्वात मोठा खेदाचा विषय आहे. हा अनुभव आज सार्वजनिक जीवनात पदोपदी येतो आहे.

जे लोक सकाळी ध्वजावंदनाला जातात. त्यातले काही लोक कागदी तिरंगे झेंडे उत्साहाने हातात घेत नाहीत. मग कार्यक्रम झाल्यावर ते लोक हे कागदी तिरंगे झेंडे रस्त्यावर सोडून निर्दयतेने निघून जातात.

अशा वेळी खरे देशभक्त ध्वजावंदन करुन, रस्तोरस्ती फिरतात आणि संध्याकाळ होईपर्यंत ते रस्त्यावरचे झेंडे गोळा करतात. असा एक देशभक्त मित्र मला भेटला होता. तो मला म्हणाला होता, लोक का झेंड्याला सलामी

देतात? हे अजून मला समजत नाही. कारण ज्या क्रांतिकारकांनी या तिरंगी झेंड्यासाठी रक्त सांडवले. त्या तिरंगी झेंड्यांना हे लोक रस्त्यावर का टाकतात? म्हणून मी या पावन भूमीवर बसून, हे तिरंगी झेंडे गोळा करतो. समाजाने याचा विचार केला पाहिजे. अशाप्रकारे त्याने आपली भावना व्यक्त केली.

खरोखर आपण सर्वांनी याचा विचार करायला हवा. १५ ऑगस्ट २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण पर्यटनाला जाण्यासाठी नसतात. या सणांच्या दिवशी आपण सर्वांनी क्रांतिकारकांच्या आणि सुधारकांच्या विचारांचे स्मरण करायचे असते. धार्मिक सणा दिवशी आपण ज्याप्रमाणे चर्च, मशिद, मंदिरात जातो. त्याचप्रमाणे आपण आपला तिरंगा ध्वज उभारुन, त्यास सलामी द्यायला हवी किंवा ध्वाजावंदनाच्या सार्वजनिक कार्यक्रमात सामील व्हायला हवे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता कागदी तिरंगे झेंडे प्रत्येकाने आपल्या हातात घेतले पाहिजेत. ते रस्त्यावर न टाकता आपल्या घरात नेऊन लावले पाहिजेत. तरच आपण खऱ्या अर्थाने भारतीय होऊ शकू, एक भारतीय म्हणून मला असे वाटते.

# ३) विवाहसंस्थेचे बदलते स्वरूप



लग्न असतो सोहळा दोन जीवांच्या मिलनाचा, लग्न असतो सोहळा दोन कुटूंबातील स्नेहबंधाचा, लग्न असतो सोहळा दोन संस्कृतिंच्या त्रिवेणी संगमाचा, लग्न असतो सोहळा प्रत्येक नात्यातील, भावभावनांच्या स्पंदनाचा. असा हा सुंदर विवाह सोहळा भारतीय विवाहसंस्थेचा मुळ पाया आहे. जगातील आदर्श कुटूंबव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जाते. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात पूर्वंपार परंपरेने संयुक्तकुटूंब पध्दती

निर्मिली होती. या कौटूंबिक रचनेमुळे ग्रामीण समाज एकत्रित बांधला गेला होता. म्हणजे समाजाची जडण-घडण संयुक्त कुटूंबांवर आधारित होती. म्हणून तेंव्हाचा ग्रामिण समाज स्वंयमपूर्ण होता.

हळूहळू काळ बदलत गेला, आधूनिकीकरणात शहरी वस्त्यांचे प्रमाण वाढत गेले. संयुक्त कुटूंबव्यवस्था विभक्त कुटूंबव्यवस्थेकडे जाऊ लागली, तरी आज समाजात विवाहसंस्थेचे महत्व कमी झाले नाही. परंपरागत विवाहाच्या चालीरिती अजूनही तशाच चालू आहेत. त्यात दोन कुटूंबांच्या एकत्रित विचारने मुला मुलींचे विवाह केले जातात. यात आता काळानूसार थोडा बदल झाला आहे. हीच दोन कुटूंबीये आता मुला मुलींच्या पसंतीने, त्यांच्या विचाराने विवाह ठरवू लागले आहेत. त्याचप्रमाणे आज प्रेम विवाहांच्या संख्येतही तुलणेने वाढ होते आहे. यामध्ये मुला मुलींच्या दोन्ही कुटूंबांचा लक्षणीय सहभाग दिसून येत आहे. हे परिवर्तन सध्याच्या कुटूंबव्यवस्थेत आले आहे.

यातून आपल्याला आजची समाज मानसिकता समजून घेता येऊ शकते. आज या समाजात मुला मुलींचा स्वभाव, त्यांचे मनोमिलन, त्या दोघांच्या आवडी निवडी, त्यांच्यातील जुळून येणाऱ्या नवनात्याचा वेध या

सर्व बाबींचा विचार करून, बहूतांशी विवाह पार पाडले जातात. हा महत्वपूर्ण बदल आजच्या समाजव्यवस्थेत दिसून येतो. अशा प्रकारचा बदल आजच्या युवावर्गासाठी समाधानकारक आहे. त्यामुळेच ही विवाहसंस्था अधिक बळट झाली आहे.

आधूनिक काळात या विवाहाच्या पध्दतीमध्येही आमुलाग्र बदल दिसून येत आहेत. यामध्ये पारंपारीक हिंदूविवाह हा महत्वाचा संस्कार आहे पण त्याच बरोबरीने वैदीक विवाह, न्यायालयीन विवाह असे प्रकारही अस्तित्वात आले आहेत. ज्याच्या, त्याच्या इच्छेनूसार, आर्थिक परिस्थितीनुसार हे विवाह प्रकार स्विकारून विवाह सोहळे संपन्न होतात. तसेच आज हुंडाबळी कायद्याचा वचक असल्यामुळे उघडपणे कुणीही मोठ्या रक्कमेचा हुंडा मागत नाही पण तरीही विवाह समारंभ, मुलीचे दागिने, घरातील वस्तु या सर्वांच्या नावाखाली छुपा हुंडा वसूल केला जातो. यावर कुठल्याही प्रकारची सामाजिक बंधने नाहीत, ती बंधने असली पाहिजेत. म्हणजे त्यातून विवाहीत महिलेवर छुपे अन्याय, आत्याचार होणार नाहीत. म्हणून याकडे सर्व समाजाने लक्ष द्यावे.

त्याच बरोबर हा विवाह सोहळा दोन व्यक्तींचा, दोन कुटूंबांचा व्यक्तीगत निर्णय असतो. त्या निर्णयात वधू वराचे रक्तगट, त्यांचे होणारे एकमत, आई वडील व काही नातेवाईकांचे विचार, त्यांची सहमती त्याचप्रमाणे दोन कुटूंबाचा इतिहास, त्यांचा सामजिक दर्जा, त्यांची सध्य स्थिती या गोष्टींचा एकत्रित विचार केला जावा. तसा विचार परंपरेने केला जातो पण त्यात ग्रह, नक्षत्रे, कुंडली, जन्मपत्रिका यात हामखास डोकावले जाते. त्यातून मग वधू वराचे गुणपत्रक जुळले, तरच पुढचा विचर होतो अन्य: नाही. असे करणे म्हणजे आपल्या विवेकबुध्दीला गहाण टाकने होय. असा अविचारी निर्णय कुणी घेऊ नये. त्यासाठी सदसदविवेक बाळगून प्रत्येकाने निर्णय घ्यावा.

विवाह हा ग्रह, नक्षत्रांवर अवलंबून नसतो, तो परमेश्वराचा आशिर्वाद असतो. हा परमेश्वर प्रत्येकाच्या अंतरंगात वसलेला असतो. यात फक्त आपण एकमेकाकांचे स्वभाव गुण ओळखून, क्षमतांना जाणून ते जुळू शकतात का? येवढे पाहून घ्यायचे आहे. मगच हे दोन आंतरात्मे सहज जोडले जातात. हाच परमेश्वराचा आशीर्वाद असतो. असे या ठिकाणी म्हणावेसे वाटते. म्हणून आपण सर्वांनी जन्मपत्रीकेवर विश्वस ठेऊ नये. पूर्वीच्या काळी जन्मा संबंधी अचूक माहिती नसायची, तरीही त्याकाळी

विवाह जुळवले जायचे तसेच आताच्या काळात प्रेमविवाहाने मने जुळवत विवाह संपन्न केले जातात. त्यतून त्यांचा पुढील संसार यशस्वी होतो. अशी उदहरणे आल्याला पुष्कळ देता येतील.

म्हणून वर वधुनी विवाह करते वेळी व्यसनाधीनता, अवगुण, असाध्यव्याधी, आर्थिक परिस्थिती या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करावा आणि निर्णय घ्यावा हेच खरे.

# ४) ' हे कसले परिवर्तन, हे तर अवर्तन '




हल्ली माणूस फार संकुचित होत चालला आहे. आपल्या व्यक्तिगत भावनांना तो जास्त कुरवाळत  आहे. स्वतःच्या सुखाचा विचार तो सर्वात आधी करतो आहे. दुसऱ्यांच्या भावना, वेदना, संवेदना यांची त्यला जाणीव राहिलेली नाही. माणूस समाजात राहूनही तो समाजशील झालेला नाही. कारण समाज जीवनाशी त्याचा फारसा संबंध उरलेला नाही. असे आपल्याला आज म्हणावे लागत आहे. सोशल मीडियाच्या या काळात माणूस पूर्णपणे ग्लोबल झालेला आहे. बसल्या बसल्या तो जगातील

कानाकोपऱ्यात कुणाशीही बोलू शकतो. जगातल्या कोणत्याही संस्थेत अथवा कंपनीत तो काम करू शकतो. अशाप्रकारची ग्लोबल सहजता सर्वत्र आली असली, तरी माणूस लोकल होऊन सार्वजनिक जीवनात सहज मिसळत नाही. फक्त काही मित्र मैत्रीणींच्या समूहामध्ये हा माणूस ओल्या-सुक्या पार्ट्या करतो, म्हणजे एन्जॉयमेंट करतो. त्यामुळे त्याला सामाजिक प्रश्नांची खोलवर जाणवच होत नाही. यामुळे प्रत्येक माणूस स्वतः च्या कोशात रमलेला आहे.

मित्रांनो माणसात हा बदल अचानक झालेला नाही. टप्प्याटप्प्याने माणूस समाजापासून विलग होत गेला आहे. फार पूर्वी माणूस छोट्या समूहांमध्ये राहत होता. त्या छोट्या, छोट्या समूहांचे मोठ्या समाजात रूपांतर झाले. त्यातून रूढी, परंपरा, संस्कृती, नियम, कायदे या सर्व प्रक्रिया समाजात रूढ होऊ लागल्या. त्यावेळी माणूस खऱ्या अर्थाने समाजशील होता. 'एक गाव एक समाज' ही संरचना त्यावेळी आपल्या भारतातही होती. म्हणून त्याकाळी हा समाज एकोप्याने नांदत होता. यातूनच भारतीय समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था निर्माण झाली. पुढे जगभरात काही वैज्ञानिक बदल होत गेले. आधुनिक काळात ज्यावेळी युरोपात औद्योगिक क्रांती झपाट्याने झाली. त्याचवेळी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ वाढू

लागली. पुढे जाऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले. या भारताने मग आधुनिकतेचा स्वीकार करून, आपल्या देशातही औद्योगिक क्रांती घडवून आणली. त्यातून नागरीकरणाला गती मिळाली. 'जिथे कारखाने तिथे शहरे' निर्माण झाली. अशावेळी संयुक्त कुटुंब व्यवस्था लोप पावत चालली आणि विभक्त कुटुंब व्यवस्था हळूहळू तयार होऊ लागली.

या सर्वातून माणासाचा स्वार्थी स्वभाव उफाळून वर आला, तो पुढे अधिकाधिक वाढू लागला. नवरा, बायको आणि मुले असा नीटनेटका संसार गोड वाटू लागला. कुटुंबात दूर राहूनही जवळची नाती जपता येतात, याचाच माणसाला विसर पडू लागला. 'मी आणि माझे चौकोनी कुटुंब' इतकेच भावविश्व प्रत्येकाला आपलेसे वाटू लागले. त्यातून संयुक्त कुटुंब व्यवस्थेची नाती दुरावत गेली. एवढे होऊनही भागले नाही, म्हणून विभक्त कुटुंब व्यवस्थेलाही तडे जाऊ लागले आहेत. त्यामुळे आजच्या काळात सगळीकडे घटस्फोटांचे प्रमाण अतोनात वाढते आहे. त्याला पर्याय म्हणून लिव्ह इन रिलेशनशिपचे नवे नाते रुजू लागले आहे. त्यामुळे समाजात 'नो किड्स नो किचन' ही संकल्पना वाढू लागली आहे. त्यामुळे हा समाज नेमका कुठल्या दिशेने जातोय, हेच कळेनासे झाले आहे.

भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे. परिवर्तन  हाच जगाचा नियम आहे परंतु या समाजव्यवस्थेत जे काही परिवर्तन चालले आहे ते खेदजनक आहे. अशाप्रकारच्या परिवर्तनामुळे समाज रसातळाला जाणार आहे. हे सारे विश्व दिवसेंदिवस प्रगत होत असताना, हा समाज मात्र अधोगतीला चालला आहे. यातून माणूस पुढच्या काळात कदाचित आधुनिक पशु  म्हणून वावरणार आहे. अशी भीती निर्माण झाली आहे. या आधुनिक मानव पशूंमध्ये समाजव्यवस्था असेल पण नातेसंबंध नसतील. असे विश्व नक्कीच पुढच्या काळात अस्तित्वात येणार आहे. असे हे असंवेदनशील विश्व आपल्याला नको असेल, तर आपण समाजाची पुनर्बांधणी केली पाहिजे, असे मनोमन वाटते.

# ५) कवयित्री शांता शेळके यांची अनमोल पैठणी

## काल आणि आज



कवयित्री शांता शेळके यांची एक सदाबहार कविता आहे. ती कविता आजीपासून नातीकडे प्रवास करते. म्हणून ती कविता कालही लोकप्रिय होती आणि आजही लोकप्रिय आहे. त्या कवितेचे नाव  पैठणी असे आहे. फडताळात एका गाठोड्यात घडी करुन ठेवलेली, आजीची एक जुनी पैठणी शांता शेळके यांना सापडली. मग त्या पैठणीची रंगसंगती, त्यावरील नक्षी,

तिचा जरीचा पदर या सगळ्याचे वर्णन सुरुवातीला शांताबाईनी फर सुरेख केले आहे. यानंतर त्यांनी भावभावनांच्या रेशीम धाग्यांची विण सुंदर शब्दात गुंफली आहे. त्यात त्यांनी सांगितले, प्रत्येक श्रावणात तूप, कापूर, उदबत्या, दिवे याच पैठणीच्या साक्षीने आजीने तेवले होते. काम करताना माखलेली बोटे कितीतरी वेळा आजीने या पैठणीला पुसली होती. आजीचे तन, मन याच पैठणीने जपले होते. आजोबांचे प्रेम याच पैठणीसह आजीने अनुभवले होते. अशी ही मायेची, प्रेमाची, आपुलकीची उबदार आजीची पैठणी आहे.

खरोखर आपल्या मागील पिढीत अशा भावना जपल्या जात होत्या. मुलीला किंवा नातीला आजीने ठेवलेल्या जुन्या पैठणीचे अप्रूप होते. त्याचवेळी मुलाला किंवा नातवाला आजोबांच्या कोटाचे, सदऱ्याचे कौतुक वाटायचे. आजीची पैठणी नेसून नात तिच्या आठवणीत रमायची. आजोबांचा सदरा, कोट घालून नातू समारंभात मिरवायचा. त्या दोघांनाही आपले आजी आजोबा जवळ आहेत असे वाटायचे. आजीची ती पैठणी बघून आजोबा नातीला गोड आशीर्वाद द्यायचे. आजीही आजोबांचा तो सदरा पाहून नातवाला गोड आशीर्वाद द्यायची, त्याचे कौतुक करायची. मग आजी आजोबा गेल्यावरही नातवंडांना त्यांची आठवण यायची. अशी ही

आजीची अनमोल पैठणी होती. म्हणून शांताबाई शेळके यांनी त्याकाळी ही कविता लिहिली. आजही ती कविता सर्वांना आवडते.

पण मित्रांनो आताचा काळ फार बदलला आहे. हल्लीचे तरुण वयाच्या ३० ते ३५ वर्षात लग्न करतात, त्यानंतर त्यांना उशीरा मुले होतात. मग तिथून पुढे शिक्षण घेऊन त्यांची प्रौढ मुले लग्न करणार, त्यांना मुले बाळे होईपर्यंत, हे आजचे तरुण सत्तर, पंच्याहत्तर वर्षाचे होऊन, अवकाशात गुडूप होणार. मग कसली आजीची पैठणी आणि कसले आजोबा. आजच्या लाईफ स्टाईलमुळे व वाढत्या करिअरच्या स्पर्धेमुळे ही जुनी नाती आता विरून गेली आहेत. हे परिवर्तन आपल्याला स्वीकारावेच लागेल, त्यात काही शंका नाही. त्याकरता आजच्या तरुण पिढीने आपल्या छोट्या मुलांना कळत नकळत जेष्ठनागरिक संघात अथवा वृद्धाश्रमात नेले पहिजे. त्यातून त्यांना आजी आजोबा आणि त्यांचे प्रेम समजू शकेल तेव्हा आपण ही पैठणी कविता खऱ्या अर्थाने अनुभवू शकू.

त्याचप्रमाणे मित्रांनो सध्याचा काळा हा 'युज अँड थ्रो' चा आहे. यामध्ये आज घेतलेले दिवाळीचे कपडे पुढच्या दिवाळीपर्यंत कपाटात नसतात, तर मग जुनी आजीची पैठणी गाठोड्यात कशी सापडणार. म्हणून

कवयित्री शांता शेळके यांची पैठणी ही कविता आजरामर ठरली आहे. ती कविता म्हणजे आठवणीचा  अनमोल ठेवा आहे असेच वाटते.

पैठणी:- (शांता शेळके कविता)

फडताळात एक गाठोडे आहे
त्याच्या तळाशी अगदी खाली
जिथे आहेत जुने कपडे
कुंच्या टोपडी शेले शाली

त्यातच आहे घडी करुन
जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर जरी चौकडी
रंग तिचा सुंदर धानी.

माझी आजी लग्नामध्ये

हीच पैठणी नेसली होती
पडली होती सा-यांच्या पाया
हाच पदर धरून हाती

पैठणीच्या अवतीभवती
दरवळणारा सुष्म वास
ओळखीची... अनोळखीची...
जाणीव गूढ आहे त्यास.

थूर कापूर उदबत्यांतून
जळत गेले किती श्रावण
पैठणीने या जपले
एक तन.. एक मन..

खसहिन्यात माखली बोटे
पैठणीला केव्हा पुसली

शेवंतीची, चमेलीची
आरास पदराआडून हसली.

वर्षामागुन वर्षे गेली
संसाराचा सराव झाला
नवा कोरा कडक पोत
एक मऊपणा ल्याला

पैठणीच्या घडीघडीतून
अवघे आयुष्य उलगडत गेले
अहेवपणी मरण आले
आजीचे माझ्या सोने झाले.

कधीतरी ही पैठणी
मी धरते ऊरी कवळुन
मऊ रेशमी स्पर्शामध्ये

आजी भेटते मला जवळुन

मधली वर्षे गळुन पडतात,
कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्यांनो
आजीला माझे कुशल सांगा.

# ६) माणसातील समाज जीवन




हल्लीच्या तरुण मित्रांची लाईफस्टाईल बदलत चालली आहे. करिअर मायंदेड (करिअर मानसिक) धकाधकीच्या जीवनात हे सारे जग धावत आहे. त्यामुळे काही वर्षांपासून जवळची रक्ताची नाती दुरावत चालली आहेत. फक्त यात मैत्रीचे आणि प्रेमाचे नाते जवळ आले आहे.

त्यामुळे आजचे तरुण मित्र सोमवार ते शुक्रवार मान मोडून ऑफिसात काम करतात. मग सॅटर्डे, संडेला हॅपी जर्नी म्हणत लाईफ एन्जॉय करतात. त्यामुळे हे सर्वजण मैत्रीच्या नात्यात आणि प्रेमाच्या गुलाबी स्वप्नात धुंद होऊन, मन मुक्तपणे जीवन जगतात. पुन्हा मग ते आपल्या नित्याच्या कामाला लागतात. ही आजच्या गतिमान जीवनाची वास्तवता आहे. ती कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणून या आमच्या तरुण मित्रांना वयस्कर माणसांची व्यवस्थित काळजी घेता येत नाही.

त्यामुळे आज समाजात वृद्धाश्रमांची संख्या वाढू लागली आहे. वृद्धांचे हे प्रश्न असे ऐरणीवर येत असताना, समाजात एक सकारात्मक बदल दिसून येत आहे. मध्यंतरी माझ्या वाचनात एक संकल्पना समोर आली. त्या संकल्पनेनुसार पुढच्या काळात वृद्धाश्रमांना जोडून अनाथाश्रम यावेत, असा विचार त्यात केला गेला होता. कारण अनाथ मुलांना आई बाबा, आजी आजोबा यांचे मायेचे छत मिळत नाही आणि वृद्धांना मुला, नातवांचा भावनिक आधार मिळत नाही. म्हणून या दोन वंचित झालेल्या घटकांना एका छताखाली मायेची छाया मिळावी, हा शुद्ध हेतू या संकल्पने मागे आहे. म्हणून ही संकल्पना लवकरात लवकर समाजात कार्यान्वित

व्हावी. त्यामुळे अनाथांना मायेचे घर मिळेल आणि वृद्धांच्या आयुष्याची सांज आनंदी होईल.

त्यावेळी एखादा वृद्ध अनाथ मुलाला आपली जीवन गाथा सांगताना शेवटी म्हणेल. हे बघ बाळा तू पुढे लग्न करशील, संसार उभा करशील, मुलांना वाढवशील, शिक्षण देशील, त्यांना त्यांच्या पायावर उभ करशील पण तू त्यांच्या मायेच्या मोहजाळात अडकू नको, त्यांच्याकडून कुठली आपेक्षा करु नको. तशी अपेक्षा तू केली, तर वृद्धापकाळात तुला माझ्या जागेवर यावे लागेल. हा विचार सहज माझ्या मनात येऊन केला. त्यावेळी एक कारुण्य लेखक म्हणून मला जाणवले, ते कारुण्य असे होते. लग्ना आधीच्या शारीरिक संबंधांमुळे किंवा दारिद्र्यात असलेल्या आई वडिलांच्या पोटी जन्म झाल्यामुळे काही मुलांना रस्त्यावर टाकले जाते अथवा दुर्दैवाने आई वडिलांचे छत्र हरवल्यामुळे मुलांना अनाथालयात यावे लागते, तर दुसरीकडे मुलांना जन्माला घालून, त्यांचे पालन, पोषण, शिक्षण करुन त्यांना घडवले जाते. मग ती मुल एक दिवस आपल्या वयस्कर आई वडिलांना वृद्धाश्रमात घालतात. ही या दोन समाज घटकांची कर्म कहाणी आहे.

म्हणून आपण या कारुण्यमय भावनेचा साकल्याने विचार करावा. हल्लीच्या धकाधकीच्या, गतिमान जीवनात. तरुणांना आपल्या वयस्कर आई वडिलांची काळजी घेता येत नाही. असे असले तरी त्या तरुण मित्रांनी आपल्या एन्जॉयमेंटचा एक तास आई वडिलांना जरूर द्यावा. कारण आजच्या घडीला ते वृद्ध आहेत. उद्या आजचे तरुण वृद्ध होणार आहेत. म्हणून आज आपण थोडासा वेळ वयस्कर मंडळींकरता काढायला हवा. वृद्धाश्रमात जाऊन वृद्धांना सहकार्य करायला हवे. त्याचप्रमाणे महामारीसारख्या परिस्थितीत काही मुलांचे पालक अनंतात विलिन झाले. त्यामुळे या मुलांचे मायेचे, प्रेमाचे छत निघून गेले, ही मुले बेघर झाली. अशा मुलांच्या सामाजिक दत्तक फंडात आपण फुल ना फुलाची पाकळी द्यावी. कदाचित आपल्या मुलांवरही ही दुर्दैवी वेळ येऊ शकते. कारण माणूस पाण्याचा बुडबुडा आहे. हा बुडबुडा फुटण्या आधी आपण सर्वांनी पुण्य संचित करावे. अनाथाश्रमांना वृद्धाश्रम जोडल्यावर सुद्धा त्यांचे कारुण्य कमी होत नाही. त्यामुळे प्रत्येकाने माणूस म्हणून आपले हे कार्य करावे, तरच आपण म्हणू शकू माणूस हा समाजशील प्राणी आहे.

# ७) महाराष्ट्राचे राजकारण आणि हिंदुत्व



सर्वधर्मसमभाव हा भारतीयत्वाचा खरा चेहरा आहे पण देशातील सर्व नागरिक या चेहऱ्याला विसरतात. मग अर्थाचा अनर्थ होतो. या चूका सुधारून प्रत्येक नागरिकाने खरी बाजू जाणून घ्यावी. याकरता हा लेख लिहिला आहे. जय भारत

महाराष्ट्राच्या राजकारणात तीस वर्षानंतर पुन्हा एकदा हिंदुत्व हा शब्द आला आहे. १९९० च्या दशकात मुंबईत बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदवी

स्वराज्याचा विचार मंडत. हिंदुत्व हा शब्द महाराष्ट्राच्या राजकारणात आणला. मग तिथून पुढे त्यांना हिंदूहृदयसम्राट ही उपाधी मिळाली. त्याचवेळी नागपुरातून रामनामाचा जप सुरू झाला. भारतीय राजकारणात त्याचे पडसाद उमटले. त्यानंतर महाराष्ट्रात १९९५ साली शिवसेना, भाजप युतीचा भगवा महाराष्ट्रात फडकत होता. त्यातून पुढे अटल बिहारी वाजपेयी यांनी देशात लाल किल्ल्यावर तिरंगा झेंडा फडकवला. आता २०१४ सली मोदींनी तेच केले.

म्हणजे महाराष्ट्राला जेव्हा जेव्हा भारतीय राजकारणात आपले राजकीय विचार घेऊन जावे लागतात तेव्हा त्यांना आपले हिंदुत्व सिद्ध करावे लागते. ही सर्वात मोठी खेदाची गोष्ट आहे. त्यामुळे महाराष्ट्रातला मराठी माणूस प्रश्नात पडतो, त्याला असे वाटते. आपण हिंदू आहोत का? आपण हजारो वर्षांपासून अस्तित्वात होतो का? रामायण, महाभारतात आपण कुठे होतो? असे इत्यादी प्रश्न मराठी माणसाला कायम पडतात. याचे उत्तर असे आहे. मराठी माणूस हजारो वर्षांपासून हिंदू होता. रामायण, महाभारत काळात अनेक महत्त्वाचे प्रसंग याच महाराष्ट्रात घडले. त्याचे पुरावे आपल्याला सापडतात पण मित्रांनो तेव्हा या आपल्या हिंदुधर्माला हिंदू म्हंटले जात नव्हते. वैदिकशास्त्र किंवा वेदशास्त्र असे संबोधले जात

होते. गीतेत भगवान श्रीकृष्णाने प्रत्यक्षात हिंदू असा शब्दप्रयोग कुठेही वापरलेला नाही. हे आपल्याला सहज दिसून येते परंतु बाराव्या शतकात परकीय आक्रमणे झाली. मग भारतीयांनी हिंदूधर्म हा शब्द धारण केला, असे आपल्याला कळून येते.

कारण भारतात आलेल्या या परकीय लोकांनी या स्थानिक हिंदू लोकांवर अन्याय, अत्याचार सुरू केले. त्यामुळे हिंदूधर्म राजकीय बाबतीत प्रबळ झाला नाही. फक्त सामुदायिक जीवनात हा हिंदूधर्म आचरणाने सबळ राहिला. म्हणजे या हिंदूधर्माला त्यावेळी राजकीय बाबतीत ग्लानी आली होती. अशा वेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याला जागृत केले. क्षत्रियांच्या मनात विश्वास जागवला. बलोपसना, मनोपासाना यातून मारुतीरायाच्या भक्तीचा आधार घेऊन, समर्थ रामदास स्वामींनी हिंदुत्वाचा ओमकार भारतभर पसरवण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक जातीला वेदांताचा अर्थ सांगण्याचा अधिकार आहे. असे जगतगुरु तुकाराम महाराजांनी हिंदू धर्मपिठासमोर ठासून सांगितले. पुढे टिळक, रानडे, कानडे, गोखले, अगरकर, फुले, आंबेडकर यांनी हिंदू धर्मातून आपले प्रखर विचार मांडले. त्यातून भारतात धार्मिक, सामाजिक सुधारणा झाल्या, आणि आपल्याला स्वातंत्र्यही मिळाले.

असा हा हाराष्ट्रातील हिंदुत्वाचा ऐतिहासिक नावलौकिक असताना, याच महाराष्ट्राला सद्य काळात पुन्हा पुन्हा आपले हिंदुत्व सिद्ध करावे लागते. ही फार मोठी या राज्याची अवहेलना आहे. म्हणून हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन, त्यात कायद्याचा आदेश दाखवून एक  सच्चा मराठी माणूस भोंगे उतरवण्याची मागणी करतो. त्यावेळी महाराष्ट्रातील मराठी विरोधक त्याच मराठी माणसाची आडवनूक करतात, हे दु:खदायी आहे. हिंदुंवर अन्याय, अत्याचार, करुनही ज्या परकीय धर्माला भारतीयांनी आपल्या संस्कृतीत अनेक वर्षापासून सामाऊन घेतले. त्याच धर्माने भारतीय राज्यघटनेच्या तत्वाला न जुमानता त्यांच्या धर्मस्थळावर भोंगे बसून, उगाचच ध्वनि प्रदूषण करणे ही गोष्ट सहन न होण्यासारखी आहे. आपण हिंदू म्हणून मंदिरात जातो. तिथे घंटानाद, शंखनाद, मृदंग वादन होते पण त्यासाठी मंदिर प्रशासन भोंगे लावत नाही. भोंगे लावायचे असतील तर ते कायदेशीर परवानगी घेतात. चर्च परिसरात चर्ची पारंपरिक बेल वाजते, ती कानाला छान वाटते. म्हणून ते लोक ही बेल भोंग्यावर  वाजवत नाहीत. मग इस्लामी लोकांनी असे भोंगे मशिदीवर का लावावेत. हा या हिंदु मराठी माणसाचा

साधा, सरळ प्रश्न होता. अशा कायदेशीर, सामाजिक प्रश्नवर राजकीय रणकंदन का माजावे? याचा विचार सबंध देशाने करावा.

राज्यघटनेने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, अधिकार दिला आहे पण त्या स्वातंत्र्यामुळे राज्यघटनेतील सर्वधर्मसमभाव या तत्वाला आणि समान कायद्याच्या तत्वाला बाधा निर्माण होऊ नये. हे नागरिक म्हणून आपले प्रथम कर्तव्य आहे. कारण धर्म हा विचार व्यक्ती केंद्रात आहे. त्याला सार्वजनिक करताना समानतेच्या कायद्याचा वापर आपण करावा. म्हणजे कायद्याची रीतसर परवानगी घ्यावी. हाच एक आग्रह त्या सामान्य हिंदू मराठी माणसाचा होता. हे देशातील सर्व राजकीय पक्षांनी लक्षात घ्यावे. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असते, तर त्यांनी आपल्याला हेच सांगितले असते. म्हणून इथून पुढे सर्व भारतीयांनी संविधानाला खऱ्या अर्थाने जाणून घेण्याची गरज आहे.

# ८) शेतकरी बंधूंनी करावा निर्धार



विदर्भातील एका गावात एक शेतकरी राहत होता.

वाडवडिलांकडून आलेली तीन, चार एकराची शेत जमिन तो मोठ्या कष्टाने कसत होता. बायको दोन मुले अशा या संसारात तो रमून गेला होता. अचानक २०१० च्या सुमारास विदर्भात मोठा दुष्काळ पडला. अनेक शेतकऱ्यांप्रमाणे त्या तरुण शेतकऱ्यावरही दुबार पेरणीचे संकट कोसळले. आधीचे कर्ज आणि आता ही दुबार पेरणी यामुळे हा शेतकरी फार खचून गेला होता. आत्महत्येचा विचार त्याच्या मनात येऊ लागला. अशा

तणावग्रस्त अवस्थेत त्याचा तो विचार पक्का होत गेला. त्याच्या डोळ्यासमोर अंधार दाटलेला होता. एके दिवशी भर उन्हात तो असाच बसून राहिला होता. संध्याकाळ होत आली म्हणून तो तरुण शेतकरी आपल्या घराकडे निघाला.

तो शेतकरी घराकडे आला तेव्हा त्याची बायको वाट बघत बसली होती. ती त्याच्या सोबत आत गेली. त्यांची मुले शेजारच्या काकी बरोबर बाजूच्याच एका गावात गेले होते. मग हळूहळू त्या नवरा बायकोत कर्जाची परतफेड, पैशाची जुळवाजुळव असे बोलणे सुरु झाले. शेतकऱ्याची बायको त्याला म्हणू लागली. आपल्या पोटाला पोटभर मिळाले नाही तरी चालेल पण आधी कर्जफिडू, नंतर काय ते बघू. तोपर्यंत माझा भाऊ आपल्याला मदत करणार आहे. आपण चार हातांनी कष्ट करु मग पुन्हा सुखाचे दिवस येतील. त्यावर तो शेतकरी जरासा हासतो. आणि पुन्हा आत्महत्येच्या चक्रात गर्क होतो. त्यावेळी त्याची बायको स्वयंपाकाला लागते. स्वयंपाक तयार होतो, ते दोघे जेवायला बसतात. जेवण उरकल्यावर तो तरुण शेतकरी आत्महत्येचा विचार करत आपल्या खाटेवर पहुडलेला असतो. रात्रीची कामे आटपून त्याची बायको त्याच्या जवळ येऊन झोपते. त्याच्या हाताची उशी करुन, ती त्याच्याशी प्रेमाचा गोड संवाद करु लागते. रात्रीच्या अंधुक

प्रकाशात तिचा चेहरा फुलून आलेला असतो. तो तरुण शेतकरी आपल्या बयकोला दुजोरा देतो पण डोळे मिटून तो पुन्हा विचार करु लागतो. त्या काळजीने त्याची बायको रात्रभर अर्ध्या झोपेत जागते. पहाटेचा कोंबडा आरवतो, सूर्य नारायण हळूहळू गगनाला तांबडी सलामी देतो.

आता त्या शेतकऱ्याची बायको उठते सकाळच्या कामाला लागते. मग तो शेतकरी तयार होऊन आपल्या शेताकडे निघतो. वाटेत एका ठिकाणी नायलॉनची रशी घेतो आणि ठरवलेल्या झाडापाशी जोतो. हातातली रशी फांदीवर टाकतो, त्याचा फास तयार करतो. उंच दगडावर चढून तो फास गळ्यात अडवतो. अशा वेळी त्या तरुण शेतकऱ्याला आपल्या बायकोचा गोड, सुंदर चेहेरा दिसू लागतो. तिच्या मोकळ्या केसातला कालचा गंध त्याच्या श्वसात दरवळतो. तिच्या ओठातली उब त्याला जाणवते. तो तरुण शेतकरी आता त्याच दगडावर बसतो. त्यावेळी तो डोक्याला हात लाऊन विचार करु लागतो. आपण जर आत्महत्या केली असती, तर माझ्या तरुण बायकोचे काय झाले असते? तिच्या भावाने तिला किती दिवस सांभाळले असते? माझ्या पोरा बाळांचे काय झाले असते? कर्ज फिटून बायकोला शेत मिळाले असते का? असे एक ना अनेक प्रश्न त्या

तरुण शेतकऱ्याच्या विचारात येत असतात. तो देवाची माफी मगतो, खजील होऊन तिथून निघतो.

तो घरी आपल्या बायकोकडे येतो. तिला मिठीत घेऊन आपली हकीकत बायकोला संगतो. मग त्या दोघांचे डोळे अश्रूंनी भरतात. त्यावेळी ते एकमेकांना सांगतात आणि मनाशी निर्धार करतात. काही झाले तरी चालेल आपण असे विचार करायचे नाहीत. आत्महत्येने कुटुंबाचे प्रश्न सुटत नाहीत, तर ते अधिक वाढतात.

मित्रांनो शेतकरी हा आपल्या कुटुंबाकरता, घराकरता जास्तीत जास्त कष्ट करतो. कुटुंबाच्या  उज्वल भवितव्याकरता कर्ज घेतो. त्याच वेळी अचानक आसमानी संकट कोसळते. मग तो शेतकरी माणूस पार खचून जातो. कर्जाच्या ओझ्याखाली दबून कुटुंबातील नात्यांना विसरतो. त्यांच्यातील प्रेम, मया, आपुलकी त्याला दिसत नाही. म्हणून तो आत्महत्याकरुन मुक्त होतो. त्याच्या अशा जाण्याने कुटुंबाच्या समस्या सुटत नाहीत. उलट त्या समस्या अधिक वाढतात. त्यामुळे कुठल्याही शेतकऱ्याने आत्महत्या करु नयेत. गरिबीत, दारिद्र्यात दिवस काढावेत पण आत्महत्येचा निर्णय घेऊन, कुटुंबाला धोक्यात घालू नये. फार काळ

आपल्या कुटुंबाची परिस्थिती वाईट राहात नाही. त्यात सुधारणा कायम होत असते. या जगात प्रत्येक माणसाला संधी मिळत असते. त्या संधीचे सोने करावे लागते पण आत्महत्या केल्यावर सारे काही संपते. आपण आपल्या जीवना मुकतो, जग असेच पुढे चालत राहते. याचा सर्वांनी विचार करावा. म्हणून हा काल्पनिक प्रसंग मी आपल्या पुढे कथन केला आहे.

# ९) आरसा स्त्री जीवनाचा



हल्लीचे आमचे तरुण मित्र मुलीच्या जन्माचे स्वागत  करतात. तिला शून्य ते पाच या वयापर्यंत सजवतात, खेळवतात, लाड करतात, हव ते सर्व काही देतात.

पुढच्या जीवनात तिला प्रेमाने, मायने वाढवतात. हा लोक मानसिक बदल गेल्या दहा, पंधरा वर्षात झला आहे. कारण या आपल्या मित्रांनी,

मैत्रिणींनी बालपणी जे पाहिले, ऐकले, सोसले ते जीवन आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नये. असे वाटत असल्यामुळे या पिढीच्या मानसिकतेत अमूलाग्र बदल झाला आहे. हा बदल खुप आशादायी आहे.

पण पूर्वीचा काळ असा नव्हता. त्यावेळी मुलीच्या जन्माचे ओझे वाटायचे. तो जीव माणसाचा आहे म्हणून तिला फक्त जगवले जायचे. त्या मुलीला घरात, कुटुंबात सन्मानाने वागवले जात नव्हते, तिच्या आरोग्याची काळजी घेतली जात नव्हती,

तिच्या वागण्या, बोलण्यावर निर्बंध होते, तिला आपल्या जोडीदाराचा विचारही करता येत नव्हता.

म्हणून या आधुनिक काळात स्त्री लिंग चिकित्सा आली तेव्हा अनेकांनी मुलीच्या जन्म आधी तिला नकोशी ठरवले. त्यामुळे मधल्या काळात दर हजार मुलांमागे मुलींची संख्या सहाशे, सातशे अशी होती.

त्या आकडेवारीत  आत्ता मला जायचे नाही. फक्त यात मला काल आणि आजचा फरक दाखवायचा आहे.

आजच्या काळात मुलींच्या बाबतीत सकारात्मक  बदल होतो आहे. त्यांना सबळ करण्यासाठी सरकारकडून कायम प्रयत्न होत आहेत. असे असताना सुद्धा मुलींना कमजोर समजून त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारचे अन्याय, अत्याचार होत आहेत.

त्यामुळे अजूनही मुलींवर सहज बंधने येतात. जी मुलगी लहान असताना आपल्या पालकांबरोबर खेळायची, लाडाने पालकांच्या बाजूला झोपायची, एकत्र ताटात जेवायची. अशी ही मुलगी तेरा, चौदा वर्षाची झाल्यावर अचानक वडील नावाच्या पालकापासून, भावापासून दुरावते. मग तिने त्यांच्या किती जवळ जावे, त्यांच्या समोर वावरताना कोणते कपडे घालावेत, कोणते कपडे घालू नयेत. ही सारी बंधने त्या मुलींवर लादली जातात. या सारखी बंधने तिच्यावर का लादली जावीत? भाऊ आणि वडील ही नाती मुलीच्या जन्माबरोबर येतात. त्या नात्याला तिची काळजी असते. त्यांना हे ही माहित असते किती झाले, तरी आपण एक पुरुष आहोत आणि  ती एक स्त्री आहे. असे जाणूनही त्यांच्यात दुरावा असतो, मुलींवर बंधने पडतात.

याचे पहिले कारण आज समाजात मुलींवर शारीरिक अत्याचार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे कुणावर विश्वास असा राहिला नाही.

दुसरे कारण थेट आपल्या प्रसारमाध्यमांकडे जाते. मुलींना मासिक पाळी येते, हा एक निसर्गाचा धर्म आहे. हे सर्व मुलींना माहित असते. त्यासाठी त्या सॅनिटरी पॅड वापरतात. ते सॅनिटरी पॅड कुठले वापरावे, कुठले वापरु नये हे प्रसारमाध्यमांकडून  हॅमर केले जाते. यातून सॅनिटरी पॅड बनवणाऱ्या

कंपन्यांचा व्यवसाय वाढतो पण याचा परिणाम वासनाधीन समाज कंटकांवर  होतो. त्याचप्रमाणे कंडोमच्या जाहिराती प्रसारमाध्यमांवर येतात. त्यात लैंगिक दृश्यांची मामिका असते. कुटुंबातील सर्व सदस्य दूरचित्रवाणी बघत असतना, त्यांच्या समोर अचानक ही कंडोमची जाहिरात येते. अशा वेळी या सर्वांना अवघडल्यासारखे होते. मग अशा या जाहिराती हॅमर का केल्या जाव्यात? या जाहिरातींच्या शेवटी. 'स्त्री सक्षम आहे, तिला  कमजोर समजू नका'! असे का सांगितले जात नाही. म्युच्युअल फंडाच्या किंवा गेमच्या जाहिरातीत जसे सांगितले जाते. तसे सॅनिटरी पॅड व कंडोमच्या जाहिरातीत का सांगितले जात नाही? याचा विचार आपण केला पाहिजे.

त्याचप्रमाणे हल्लीच्या गतिमान जागात करिअरला जास्त महत्व आले आहे. असे करिअर घडवताना

लग्नाचे वय निघून जाते. अशा वेळी आजचे काही तरुण लग्न न करण्याचा निर्णय घेतात. असा निर्णय मुलांसाठी सहज असतो पण तोच

निर्णय मुलींसाठी अवघड असतो. समाज अशा मुलींकडे वेगळ्या नजरेने बघतो. प्रत्येक वेळी त्यांच्यावर संशय व्यक्त करत असतो. या जगात प्रत्येक माणसाला स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे. तो मुलींच्या बाबतीत नाकारला जातो. मुलांनी स्वतंत्रपणे जगले तर चालू शकते. मग मुलींना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार का नाही? ही एक सर्वात मोठी सामाजिक समस्या आहे. या समस्येला समाजाने सोडवले पाहिजे. हा प्रश्न एकोणिसाव्या शतकापासून चालत आला आहे. तो प्रश्न पूर्वी बंगालमध्ये उपस्थित झाला होता. म्हणजे स्त्रियांना तेव्हाही स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार नव्हता आणि तो आजच्या काळातही नाही.

म्हणजे मुलींना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मोठा संघर्ष द्यावा लागतो. कारण समाजातील बहुसंख्य लोक मुलींकडे किंवा स्त्रियांकडे पारंपरिक नजरेने बघतात, त्यांना बंधनात आडवण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यावर कायम टिकाटिपणी करतात. हा एक समाजाकडून होणारा मानसिक छळ आहे. या छळाकडे हल्लीच्या मुली दुर्लक्ष करतात पण ही समाजाची पारंपरिक त्रासदायक मानसिकता, हळूहळू वासनाधीन समाज कंटकांकडे जाते. त्यावेळी मुलींवर बळजबरीतून शारीरिक अत्याचार होतात. अशा वेळी सामाजिक वातावरण गंभीर होते. मग लोक त्या पिडीत मुलीच्या

कुटुंबाच्या मागे खंबीरपणे उभे राहतात. याचा अर्थ मुलींना, स्त्रियांना आधी असुरक्षित वातावरण द्यायचे आणि मग तिची सुरक्षा भंग पावल्यावर, अत्याचार झाल्यावर अगदी खोटेपणाचा आव आणून पाठीशी उभे राहायचे, हे न पटण्यासारखे आहे. म्हणून हा विषय आजच्या घडीला महत्त्वाचा आहे. या विषयातील सर्व गोष्टींचा आपण माणूस म्हणून विचार करावा.

# १०) लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार करून दिली. त्या राज्यघटनेला समोर ठेवून १९५० साली आपण भारतीय जनतेला प्रजासत्ताक गणराज्यात आणले. त्याकरता बाबासाहेब आंबेडकर यांनी जगभरातील काही प्रमुख देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास केला. त्याचप्रमाणे भारतातील हिंदू, जैन,

बौद्ध, शीख, ख्रिस्ती, पारशी आणि इस्लामी या सर्व धर्मीयांच्या प्रमुख धर्मग्रंथांना वाचून समांतर विचार दर्शक राज्यघटना निर्माण केली. अशा राज्यघटनेत लोकहिताची यथायोग्य मार्गदर्शक, मानवतावादी तत्वे मांडून ठेवली. त्यातून भारतीय नागरिकांना मूलभूत स्वातंत्र्य दिले गेले. त्या स्वातंत्र्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य येते.

लोकशाही या तत्वात राजा, उमराव, सरदार, प्रजा असा भेदभाव असत नाही. लोकशाही हे राज्य प्रजासत्ताक असते. या लोकसत्तेत देशाचा प्रमुख राष्ट्रपती असतो. राष्ट्रपती या पदाला आपण प्रथम नागरिकत्वाचा दर्जा दिला आहे. या पदाच्या अंतर्गत मंत्रिमंडळ येते. त्या मंत्रिमंडळाचा प्रमुख पंतप्रधान असतो. म्हणजे पंतप्रधान किंवा त्यांचे मंत्रिमंडळ लोकसेवक म्हणून जनतेसाठी कार्य करत असतात. म्हणून एका ठिकाणी भाषण करत असताना 'माननीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी' म्हणाले होते. मी जनतेचा प्रधानसेवक आहे! या विचारातून नरेंद्र  मोदी यांनी लोकमनाला अक्षरशः जिंकले. भारतातील अध्यात्मिक विचारधारेत सेवेला अधिक महत्त्व दिले आहे. हे नरेंद्र मोदी यांनी अंगिकारले आहे. म्हणून त्यांनी स्वतःला प्रधानसेवक मानले. असा हा लोकशाहीचा विचार आहे.

अशा या प्रजासत्ताक लोकशाहीला न जाणता, राज्यघटनेला न जुमानता काही लोक बेछूटपणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करतात. त्यामुळे राज्यघटनेच्या अनेक तत्वांचे अवमूल्यन होते. हे असे कधी होऊ नये, याची दक्षता नागरिक म्हणून आपण सर्वंनी घ्यावी. अभिव्यक्ती स्वातंत्र्यात सार्वजनिक कार्याबदल अथवा अमानवी कृत्यांबद्दल परखड विचार मांडण्याचा अधिकार नागरिक म्हणून आपल्याला दिला आहे. त्यात कला, साहित्य, राजकारण, समाजकारण, ज्ञान, विज्ञान या इत्यादी क्षेत्रातील सार्वजनिक कार्यंचा समावेश होत असतो. म्हणजे प्रत्येक माणूस आपल्या व्यक्तिगत जीवनात तथा सार्वजनिक जीवनात जे लोकोपयोगी कार्य करतो. अशा कार्यांवर टीकाटिपणी करण्याचा अधिकार नागरिक म्हणून आपल्याला दिला आहे.

पण कुणाच्या व्यक्तिगत खाजगी जीवनावर, त्यांच्या विचार आचारावर, त्यांच्या एखाद्या विशिष्ट आजारावर, मानसिक अवस्थेवर अभिव्यक्त होऊन, सार्वजनिक पातळीवर अपशब्दातून किंवा विकृत संवादाने बोलण्याचा अधिकार कुठल्याच नागरिकाला दिलेला नाही. हे भारतीय नागरिक म्हणून आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. हे लक्षात न घेता आपण बोललो, तर लांछन

लावणे, बदनामी करणे या अंतर्गत प्रत्येक  नागरिकावर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. त्यातून जबर शिक्षा  होऊ शकते. मोठ्या रोख रकमेचा दंडही वसूल केला जाऊ शकतो.  म्हणून विचार मांडताना आपण या सर्व गोष्टींचा विचार करावा.

गेल्या दोन, तीन महिन्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली, महाराष्ट्रात जो काही वाद-विवाद चालू आहे. तो सार्वजनिक चिंतेतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. कारण या राज्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना निर्माण केली. आज मात्र याच राज्याचे नागरिक भारतीय राज्यघटनेला अवमानित करत आहेत.

म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावावर राज्यघटनेच्या अनेक तत्वांची जनतेकडून पायमल्ली होत आहे. ही फार मोठी खेदजनक विकृती आहे. अशा प्रकारच्या अनेक घटना वारंवार या महाराष्ट्रात  घडत आहेत. त्यामुळे उगाचच  समाजात फुकटचे रणकंदन माजवले जात आहे. म्हणून असे वाटते समाजकारणात किंवा राजकारणात  येणाऱ्या प्रत्येक नागरिकाने राज्यघटनेचा थोडाफार अभ्यास करावा. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर  कुणीही घेणार नाही. या विषयाचा आपण सर्वांनी विचार करावा.

# ११) स्त्री जीवन काल आणि आज



महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची नवी क्रांती घडविली. त्या आधी स्त्रियांची अवस्था बिकट होती. संसारिक गुलामगिरी स्त्रियांच्या वाट्याला आली होती. जन्माला आल्यावर वडिलांचा धाक, आईने शिकवलेली पारंपारिक नियमावली, हे सर्व झाल्यावर तिचा बालविवाह, त्यातून तेरा, चौदा वर्षाची झाल्यावर बाई म्हणून उमलताना, तिचे होणारे लैंगिक शोषण, या शोषणातून झालेली मुलं-बाळं या सगळ्या बंधनांच्या चौकटीत स्त्रीचं आयुष्य पिचल जात होतं. म्हणजे तिच्या अवतीभवती

कुंपण होतं. अशा या कुंपणाबाहेर स्त्रीने कधीच येऊ नये. अशी व्यवस्था पुरुषप्रधान खोट्या धार्मिक संस्कृतीने स्त्रियांवर अक्षरशः लाधली होती. या कुंपणातून स्त्रीला बाहेर काढणे आवश्यक होते. याकरता ज्योतिबा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली. ती मशाल त्यांनी सावित्रीबाईंच्या हाती सोपवली. सावित्रीबाईंनी ती मशाल सक्षमपणे पेलत, सर्वसामान्य मुलींच्या हाती दिली. त्या तेजस्वी प्रकाशाने स्त्रियांचे अंतर्मन उजळून निघाले. त्यातून ही स्त्री नावाची बंदिनी सुशिक्षित व ज्ञानी झाली. काळ हा हळूहळू बदलत गेला, कर्तुत्वाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीने उत्तुंग अशी गगन भरारी घेतली. अशी ही स्त्री जन्माची यशस्वी कहाणी आहे.

या यशस्वी कहाणीमुळे भारताचा इतिहास खऱ्या अर्थाने बदलला. भारत स्वतंत्र झाल्यावर 'समान नागरी कायदा' या अंतर्गत स्त्रियांनाही मूलभूत अधिकार मिळाले. तसे अधिकार जगातील कोणत्याही स्त्रीला मिळाले नव्हते. याकरता जगभरातील स्त्रियांना आपआपल्या देशात न्यायालयीन संघर्ष द्यावा लागला. भारताने मात्र स्वातंत्र्याच्या सुर्याला नमन करत लगेचच स्त्रियांना कादेशीर समानता देऊ केली परंतु या इतिहासाच्या सुवर्णपानांना पुरुषसत्ताक समाजाने झिडकारले, तरी देखील या आधुनिक समाजात जलद गतीने परिवर्तन घडले. त्यासाठी भारतीय न्यायसंस्थेने स्त्रियांच्या कायद्यात सकारात्मक बदल करून स्त्रियांचे सामाजिक

जीवनमान बदलवले, तरीही आज समाजात सर्व ठिकाणी स्त्रियांवर अनेक प्रकाराने अन्याय अत्याचार होत आहेत. आज आपल्या भारतात स्त्रियांच्या न्यायहक्कासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कायदे प्रचलित आहेत. बालविवाह कायदा, हुंडाबळी कायदा, स्त्री लिंग चिकित्साप्रणाली कायदा, लैंगिक छळवणूक कायदा, घरगुती हिंसाचार कायदा असे इतर सर्व कायदे अस्तित्वात आहेत. या सर्वांच्या उपयोगाने स्त्रियांचे रक्षण व्हावे अशी अपेक्षा कायद्याची आहे. त्या अपेक्षेप्रमाणे आज समाजात स्त्रियांचे रक्षण होत नाही. हे आताच्या एकविसाव्या शतकाचे दुःख आहे. असे खेदाने म्हणावे लागते.

कारण निर्भया प्रकरणानंतर कायद्यात बदल झाले, तरीही त्यानंतर स्त्रियांवर क्रूरपणे बलात्कार होत आहेत. साठच्या दशकांत हुंडाबळीचा कायदा आला होता पण त्यावेळीही हुंडाबळीच्या घटना समाजात घडतच होत्या आणि आजही त्या तुरळक प्रमाणात घडतच आहेत. स्त्री भ्रूण हत्येचा कायदा गेल्या दहा, पंधरा वर्षात कडक करण्यात आला, तरी देखील समाजात स्त्री भ्रुणहत्या चालूच आहेत. घरगुती हिंसाचार कायद्याचेही तसेच आहे. म्हणजे छेडछाड, मारहाण, बलात्कार, घरगुती लैंगिक शोषण हे सारं अजूनही सुरू आहे. त्याचबरोबर मुलींना खुलेआम विकले जात आहे.

गरीब मुलींना फसवून त्यांना वेश्या केले जात आहे. हे दुष्टचक्र या प्रगत भारत देशात निरंतर फिरत आहे.

त्यामुळे स्त्रीला पुन्हा गुलाम बनवण्याच षडयंत्र शिजवलं जात आहे. या अन्यायकारक कलीच्या प्रकोपापासून स्त्रीला बाहेर काढायचे असेल, तर समाजातील विवेकशील, बुद्धिजीवी स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन, जोरदार वैचारिक संघर्षाचा दबाव ठिकठिकाणी तयार करायला हवा. स्त्रियांच्या विषयीचे कायदे ग्रामीण भागात, आदिवासी भागात, वाड्या-वस्त्यांवर पोहोचवायला हवेत. कारण आजच्या घडीलाही देशातील साठ टक्के स्त्री जनता या कायद्यांपासून कोसो दूर आहेत. असे असले तरी आज वीस टक्के शहरी स्त्रिया, स्त्रीविषयक कायद्याचा स्वार्थाने गैरवापर करत आहेत. कायद्याचा गैरफायदा घेतला जात आहे. न झालेला अन्याय, अत्याचार पुरुषांच्या माथी मारला जातो आहे. हे चित्र खरोखर वाईट आहे, दुर्दैवी आहे. असं न करता त्या वीस टक्के शहरी स्त्रियांनी खेडोपाड्यात जाऊन गरीब, असाहाय्य, कायद्या बाबतीत अज्ञानी बहुसंख्य आशा स्त्री वर्गाला सुजाण केले पाहिजे, तरच महात्मा ज्योतिबांचे आणि सावित्रीबाईंचे विचार या समाजात पावन राहतील ते पावन ठेवण्याकरता विचारशील जनसामान्यांनी सकारात्मक तथा आशादायी पाऊले पुढे टाकायला हवीत. ही या काळाची गरज आहे.

# १२) मुलं असणाऱ्या पालकांनी अधिक सजक रहावे



मुलगी वाचवा आणि मुलगी शिकवा असे आपण सहज म्हणून गेले होते. कारण मध्यंतरीच्या काळात

स्त्री भ्रूण हत्या होत होत्या. म्हणून सरकारने स्त्री लिंग चिकित्सा प्रणालीवर कायदेशीर निर्बंध आणले होते. त्यामुळे स्त्री भ्रूण हत्येला आळा बसला. त्यावेळी सरकारने मुलगी वाचवा मुलगी शिकवा हा सुविचार

प्रसारित केला. पुढे या सुविचाराचा प्रसार झाला, तरी अजूनही छुप्या पद्धतीने स्त्री भ्रूण हत्या होत आहेत. हे आपल्या देशाचे जळजळीत वास्तव आहे. पूर्वीच्या काळी हे तंत्रज्ञान विकासित झालेलं असताना, मुलींची जन्मताच हत्या केली जायची. त्यावेळी एखाद्या बाईने मुलीला जन्म दिला, तर त्या बाईला छळले जात होते. मुलांच्या तुलनेत त्या जन्मलेल्या मुलीला पोषण आहार कमी दिला जात होता. त्यामुळे ती मुलगी शारिरीक दृष्ट्या कमजोर असायची. त्यातच तिला घरच्या जवाबदाऱ्या, लग्न, बाळांतपण, संसार या सर्व गोष्टी लाधल्या जायच्या. अशा प्रकाचा अन्याय स्त्रीयांवर कायमच होत होता.  त्यांना खालच्या दर्जाची वागणूक दिली जायची. ही स्त्री जन्मची खेदजनक कहाणी आहे. ती परंपरागत चालत आली आहे.

हा स्त्री जन्माचा काळा इतिहास आजही समाजात झिरपत आहे. आजची आधुनिक स्त्री कितीही शिकली, सुशिक्षित झाली, आर्थाजन करु लागली, तरी सुद्धा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन समाजाने बदललेला नाही. आज मुलांच्या तुलनेत जास्त मुली उच्चशिक्षण येत आहेत. त्यामुळे कमी शिकलेल्या मुलांच उच्चशिक्षित मुलींशी लग्न होऊ शकत नाही. हा बदल आजकाल जाणवू लागला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात मुलींनी, स्त्रीयांनी प्रगती सधली आहे. त्यामुळे आज सर्व क्षेत्रात महिलांचा वावर मोठ्या

प्रमाणात वाढला आहे. या वावरमुळे रात्री उशिरापर्यंत महिला आपल्या कामात वेस्त असतात. हा महिलांच्या प्रगतीचा आजवरचा सकारात्मक अलेख आहे. तो स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात गतिमान झाला आहे. खरतर हा आपल्या देशाचा गौरवशाली इतिहास आहे.

पण गेल्या काही वर्षांत या गौरवशाली इतिहासाला गालगोट लागले आहे. दोन हजार बारा साली दिल्लीत निर्भया प्रकरण घडले. निर्भयावर चार जणांनी बलात्कार करून तिचा अमानुष छळ केला. या दुखापतीत निर्भया गंभीररीत्या जखमी झाली. त्यावर उपचार चालू असताना, निर्भयाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ जनप्रक्षोभ वाढत गेला, जनतेने या विरुद्ध शांततेत मेणबत्ती मोर्चा काढला. सरकारला आणि न्याय पालिकेला या घटनेने खऱ्या अर्थाने जागे केले. पुढे जाऊन सरकारने या बलात्काराच्या कायद्यात सकारात्मक बदल केले. त्यामुळे या निकालाची गतिमानता वाढली. शेवटी दोन हजार वीस येता येता. या आरोपींना फाशीची शिक्षा झाली. या प्रकरणातील खटल्यामुळे आणि बदलत्या कायद्यामुळे समाजात बलात्कार या कायद्याचा वचक बसेल असे सर्वांना वाटले होते पण हा खटला सुरू असतानाच देशातील वेगवेगळया प्रांतात लैंगिक अत्याचार,

बलात्कार, विनयभंग असे गुन्हे घडतच होते. ही या देशाची खरी शोकांतिका आहे. असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

निर्भया प्रकरणाचा निकाल लागण्या आधी दोन हजार एकोनीसला हैदराबादमध्ये एका डॉक्टर मुलीवर बलात्कार झाला. त्या मुलीला जाळून टाकण्यात आले. या प्रकरणाचा पोलिस तपास चालू असताना. यातील चार आरोपींनी पोलिसांची शस्त्रे हिसकावून.पोलिसांवर त्यांनी हल्ला चढवला. फायरिंग केली. प्रत्युत्तरात पोलिसांच्या गोळीबारात ते ठार झाले. त्यावेळी त्या पोलिसांवर कायदेभंगाचा आरोप केला गेला. या प्रकरणात पोलिसांनी सरळ सरळ कायदा हातात घेतला. असा समज काही लोकांनी करून घेतला. त्यावर चौकशी झाली आणि प्रत्यक्ष पुराव्यातून पोलिसांची या आरोपातून सुटका झाली. बहुसंख्य जनतेने  पोलिसांच्या या कारवाईला आशादायी मानले. कारण गुन्हा घडल्यावर लगेच त्या आरोपींना ठार केले गेले. ही घटना कायद्यासाठी दुर्दैवी असली, तरी सामान्य जनतेसाठी समाधानकारकक होती. हे हैदराबाद प्रकरण दोन वर्षापूर्वी घडले होते, तरी सुद्धा या समाजातील निर्ढावलेल्या स्त्री भक्षक नराधमांवर अजून कायद्याचा वचक बसलेला नाही. म्हणून आज दोन हजार एकवीसला गणेश चतुर्थीच्या दिवशी मुंबईत साकीनाका परिसरात निर्भयासारखेच प्रकरण घडून आले.

त्यानंतर लगेच डोंबिवलीमधील सामूहिक बलात्काराचे राकेट समोर आले. ३६ जणांनी एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर आठ महिने बलात्कार केले.

या सर्व घटनांचा मागोवा घेताना मनाला तीव्र वेदना, दुःख होते. आपण कितीही सुधारित पणाच्या गप्पा मारत असलो, तरी आपला समाज अजून मध्ययुगीन इतिहासात आहे, असे वाटते. कारण त्यावेळी आपल्या देशावर परकीयांची सत्ता होती. पातशहानी भारतात धुडगूस घातला होता. त्यांनी लोकांना गुलाम बनवले व इथल्या स्त्रियांची त्यांनी विटंबना केली. पण आज आपल्या देशात सुराज्य आहे, तरी या भारतात हे बलात्कार का होतात? ही सर्वात खेदजनक गोष्ट आहे. माणसाला माणूसपणाची लाज वाटावी इतक हे भयान वास्तव आहे. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे असे प्रकार सर्वत्र घडू लागले आहेत.  माणूस या तंत्रज्ञानामुळे लोकल पासून ग्लोबल झाला पण खरंतर तो माणसापासून दानव झाला. असे आपल्याला नक्की म्हणता येईल. त्यामुळे सरकारने या सोशल मीडियाच्या गैरवापरावर पूर्णतः निर्बंध आणावेत. कारण सोशल मीडियाचा वापर करताना, विवेकशील, बुद्धिजीवी माणसाला या चुकीच्या गोष्टींचा त्रास होतो. नको त्या गोष्टी समोर येत असतात. आपण सर्वजण अशा गोष्टींना पुढे ढकलतो

अथवा डिलीट करतो, तरीही या गोष्टी आधून मधून समोर येतात. या गोष्टी जर अर्धवट बुद्धीच्या खोडील, बेरक्या माणसांनी पाहिल्या, तर त्या गोष्टींचा विपरीत परिणाम त्या माणसांच्या अंतर्मनावर होतो. त्यांची मानसिकता हळूहळू बदलते आणि मग तो त्यातून ही गैर कृत्ये घडवतो. म्हणून सरकारने सोशल मीडियाच्या गैरवापरावर

ठोस पावले उचलून त्यांच्यावर बंदी अनावी. असे प्रत्येक सुजाण नागरिकाला वाटते.

काही वर्षांपूर्वी बलात्कार झालेल्या मुलींना लोक दोशी ठरवायचे. ते म्हणायचे, ती मुलगी रात्री उशिरापर्यंत बाहेर असते, तिनेच त्या मुलाला नादी लावलं असेल, वेडेवाकडे कपडे घालून फिरली असेल. म्हणून त्या मुलात गैरकृत्याच्या भावना उफाळून वर आल्या असतील. म्हणून या मुलीवर बलात्कार झाला. हा समज करासर चुकीचा आहे, हे लोकांना आज पटू लागले आहे. कारण साधा सरळ स्वभाव असलेल्या, निट नेटका पोशाख परिधान केलेल्या मुलींवरही बलात्कार होतात हे सर्व करून त्यांना जीवे मारले जाते. त्यामुळे अशा प्रकरणांची गंभीरता सामान्य जनतेला समजू लागली आहे. या लेखाचा शेवट करताना मला नेहा शर्मा या कवयित्रीचे विचार प्रगट करावेसे वाटतात. ती आपल्या 'आईना' या हिंदी कवितेला

सादर करता म्हणते. मी ही कविता लिहिली पण  मला असे वाटते. ही कविता सदर करण्याची वेळ माझ्यावर कधी येऊ नये. कारण ही कविता बलात्कारीत मुलीच्या सामाजिक व्यथेची आहे. हा विषय नेहा शर्मांने अतिशय संवेदनशीलतेने या कवितेत आणला आहे. त्यामुळे आपण सर्वांनी युट्युबवर जाऊन, जी तलकस (G -TALKS) चॅनेलवरची नेहा शर्माची 'आईना' ही हिंदी कविता ऐकावी आणि मुलं असणाऱ्या पालकांनी अधिक सजक राहून. आपल्या मुलांच्या हालचालीवर लक्ष ठेवावे. हे पालकांच्या हातात आहे.

# १३) वाचन संस्कृती आणि समाजमाध्यमे




वाचन हा जीवनाचा आधार होता. म्हणूनच वाचाल तर वाचाल ही म्हण प्रचलित झाली.

जेव्हा माणूस चित्र लिपीतून अक्षर लिपीतकडे येऊ लागला. त्यावेळी शिलालेख, धातूलेख वृक्षपर्णलेख इत्यादी साधनांचा वापर करुन तो दैनंदिन व्यवहारीक जीवन जगू लागला. हे आपणस प्राचिन ऐतिहासिक साधनसामुग्रीतून दिसून आले आहे. या नंतर मात्र माणसाने आपल्या विचारांना हास्त लिखितातून ग्रंथ स्वरुपात आणले. तिथून पुढे वाचन संस्कृतीचा उदय झाला असावा. कारण लिखित ग्रंथसाहित्यातून माणसाचे

विचार समुहापर्यंत, समाजापर्यंत पोहोचू लागले. त्यातूनच काही जागतिक प्राचीन ऐतिहासिक संस्कृती निर्माण झाल्या. या सर्व गोष्टींचा परीपाक म्हणून मानवाचा वैचारिक, तांत्रिक विकास झाला.

माणसाच्या या वैचारिक, तांत्रिक विकासातून छपाई तंत्राचा शोध लागला. यानंतर कमीत कमी वेळात जास्तीत जास्त संख्येने ग्रंथसाहित्य निर्माण होऊ लागले. अक्षरज्ञानामुळे किंवा शिक्षण प्रसारामुळे वाचक अधिका अधिक वाढू लागले. यातूनच वाचन संस्कृतीचा विस्तार होऊ लागला. अशा प्रकारे वाचन संस्कृतीचा थोडक्यात इतिहास आपल्याला संगता येऊ शकतो. पण आपल्याला आता वाचन संस्कृती म्हणजे नेमके कायं हे समजून घ्यायचे आहे.

वाचन संस्कृतीला समजून घेताना आपल्याला वाचन म्हणजे काय? वाचन प्रक्रियेतून माणसात कसा बदल होतो? हे आपल्याला पाहायचे आहे. वाचन म्हणजे फक्त अक्षर, शब्दांची ओळख नाही किंवा महितीजन्य साठवणूक नाही. तर त्या वाचनातून काही आकलन होणे, ते आकलन स्मरणात राहणे, त्या स्मरणाचे ग्रहण क्षमतेनुसार त्वरित चिंतन घडून, तो

विचार आपल्या स्मरणामध्ये चिरकाळ राहणे म्हणजे खऱ्या अर्थाने वाचन होय.

अशा पध्दतीने हे वाचन सातत्याने केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाअधिक सशक्त होऊन, बुद्धीमत्ता प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूनी विकास होतो. परंतू हे वाचन सदभावकतेने व्हावे. म्हणजे आपण मिळवलेल्या ज्ञानाचा वापर विधायक कार्यासाठी करावा. या सर्व प्रक्रियेला आपण वाचन संस्कृती असे म्हणतो. चागलं वाचल्यावर, चागलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुध्द होते. यातून आपली भाषा तसेच वक्तृत्व श्रवणीय होते. यातून आपण कायम आत्मविश्वासू राहुन, आल्या प्रसंगाला तोंड देत यशस्वीपणे मात देतो. त्यातून माणसाचे व्यक्तीमहत्व बहरते.

परंतु हीच वाचन संस्कृती आज लोप पावत आहे. याचे कारण विविध प्रकारच्या समाजमाध्यमांनी काही प्रमाणात ग्रंथसाहित्याची पिछे हाट केली आहे. सुरुवातीला ब्रिटिश काळात रेडिओ आला, तेंव्हा ग्रंथसाहित्य वाचकांची संख्या कमी झाली नव्हती. नाटके, पुस्तके, दैनिके आणि रेडिओ

अशी चौसुत्री त्या काळी होती. त्यानंतर दुरचित्रवाणी माध्यम आले, कालांतराने त्याचा पडदा रंगीत झाला. यातून थोडी वाचन संस्कृती मागे पडू लागली. अनेक प्रकारच्या वाहीण्यांमुळे लोक वाचनापासून दूर गेले. २४ तास मालिका, चित्रपट यांच्या जंजाळात ते अडकले. आजच्या घडीला तर या प्रसारमध्यमांच्या जोडीला मोबाईल नेटवरील समाजमाध्यमांनी लोकांना अधिक आडकवून ठेवले आहे. त्यामुळे वाचनावर विपरीत परिणाम झाला. आहे.

या सर्वातून लोकल माणूस ग्लोबल झाला असला, तरी नातेसंबंधांची विन सुटली आहे. मैत्रिचा खरा अर्थ विस्मरणात गेला आहे. हे का घडते आहे? याचे कारण आपण वाचन संस्कृतीपासुन लांब गेलो आहोत. पूर्वी ऐतिहासिक पुस्तकांमुळे आपल्या मनात राष्ट्रनिष्ठा असायची, कादंबरी, कथासंग्रह यांच्यामुळे माणुसकी भाव जागा असायचा, काव्य वाचनातून, श्रवनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होयची, रोजच्या वृत्तपत्रांमुळे जनमाणसात सामाजिक भान जागायचे. पण ती मानसिकता आज हारवली आहे. समाजमाध्यमे चांगल्या अर्थाने परिणाम कारक असली तरी त्याचा दुर्योपयोग होत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा माणासाने वाचन संस्कृतीकडे वळावे. याचमुळे हाल्ली समाजमाध्यमात ई - बुक हा

ग्रंथसाहित्य प्रकार प्रचलित होत आहे. पण तरी सुद्धा छापील पुस्तके अनमोलच आहेत. या पुस्तकांचा दर्जा उच्चच राहणार आहे. कारण नुसत्या ई - बुक प्रकाशनाचा दर्जा उत्तम असेलच असे नाही. अशा प्रकारे समाजमाध्यमांच्या वापरामुळे वाचन संस्कृतीवर विपरीत परिणाम झाला आहे. पण तरीही मित्रानो वाचन संस्कृतीला परियाय नाही. त्यामुळे आपल्या व समाजाच्या भल्यासाठी ही संस्कृती जपायलाच हावी.

# १४) एक पावसाळी शब्दांकित सहल



पाऊस हा कुठून येतो, कसा भरतो आणि मग कसा काय बरसतो. या बाबतीत खरंतर आपण अनभिज्ञ असतो. ते सर्व आपल्या विचारा पलीकडच आहे. माणूस कितीही विचारशील असला, तरी त्याला पाऊस नेमका कसा येतो हे अजून समजलं नाही. शास्त्रशुद्ध भाषेत आपण म्हणतो. सूर्याच्या उष्णतेने समुद्रातील पाण्याचे बाष्पीभवन होते. ते वर जाते, थंडावा निर्माण होतो. त्याचेच ढग होतात आणि ते बरसू लागतात. पण अध्यात्माच्या भाषेत सांगायचे झाले, तर हिवाळा, उन्हाळा या ऋतूचक्रामुळे सृष्टी जेव्हा कंटाळवाणी होत जाते तेव्हा सृजनात्मक देवाला

अज्ञा होते. तो मग वसंताला पाठवून, मागोमाग मेघ राजांचे सैन्य पाठवतो. त्यामुळे हा पाऊस पडतो. दुसऱ्या भाषेत सांगायच झाल, तर आपल्या जीवनातील अंतर्मन कडक उन्हाने वाळवंटासारख होऊन जातं तेव्हा आपल्यातील आनंदाचा हरिनाम लुप्त होतो. त्यावेळी सर्व अबीर रुपी मेघ एकत्र येतात, काळोख दाटतो. मग तो सावळा विठ्ठल आपल्या भक्तिमय जलधारेत सगळ्यांना तल्लीन करतो आणि अवघ्या जीवनाची पंढरी होऊन जाते. म्हणजे आपणास परमानंद होतो. अशाप्रकारे या पावसाचे वर्णन केले जाऊ शकते.

अशा या पावसात आपल्याला जायचं असतं, मनमुराद पावसाचा आनंद घ्यायचा असतो. अशावेळी प्रत्येक जण पावसाची सैर करण्याकरता आतुर झालेला असतो. परंतु आजच्या या कोरोना काळात सर्वच गोष्टींवर बंधनं आली आहेत. त्यामुळे आता कुठे जाता येत नाही, फिरता येत नाही. म्हणून आपण ही शब्दरूपी पावसाची सैर करणार आहोत.

आपल्या मनात असा भाव प्रगट करा, सध्या उन्हाळ्याचे अखेरचे दिवस सुरू झाले आहेत. वर आभाळ आलेलं आहे. यामुळे थोडी अधिक गर्मी वाढली आहे. अशातच वारे वाहू लागले आहेत. ते थोडे थंडगार होत

आहेत. वादळी वारा सुरू झाला आहे. अधूनमधून एखादी वीज लखाकुन जात आहे. मधूनच क्वचित गडगडाट ऐकू येत आहे. आता वाऱ्याचा झोत वाढलेला आहे. त्यातच रिमझिम रेशीम धारा बरसू लागल्या आहेत. मातीचा गंध दरवर्षाप्रमाणे अनामिक असा दरवळू लागला आहे.

आता छत्री घेऊन बाहेर जाऊ या. नाहीतर छत्री नको असंच भिजत जाऊ या. असं आपल्या मनात चाललेलं आहे. आता बाहेर रस्त्यावर कुणी मक्याच्या कंसावर यथोचित ताव मारत आहे, तर कुणी कांदाभजी खाण्यात मग्न आहेत. ते लोक बघा पावसाचा निर्मळ आनंद घ्यायचा सोडून ओल्या पार्ट्या करत आहेत. कधी हे सुधारणार देव जाणे. असं सभोवतालचं पावसाळी लोकजीवन सुरू असताना, आपल्या डोळ्यासमोर काही चित्र दिसू लागतात.

ते पहा समोरं एक लहान मुलं 'मला पावसात जाऊ दे' असं आईला म्हणत आहे. बाहेर जाण्याचा लाडीगुडीचा प्रयत्न सुरू आहे. बाबांच्या बालपणीची ती कागदी होडी मुलगा हट्टाने तयार करून घेत आहे आणि मग खुशाल होडी पाण्यात सोडली जात आहे. भर पावसात ते मुल नाचत आहे, गात आहे. पाऊसाच्या धारांनी त्यास ओले चिंब केले आहे. आजच्या या स्मार्ट मोबाईलच्या

जमान्यात मुलं असं करतील का हा प्रश्न पडलेला आहे. पण मुलांना आजही पाऊस खूप आवडतो, यात कोणतीही शंका नाही. असा हा पाऊस लहान मुलांचा आहे.

आता जरा त्या ठिकाणी पहा, त्या तिथे एक युवती  यौवनाच्या पहिल्याश्या तीरावर उभी आहे. ती युवती पावसाच्या अगणित सुया टोचून घेत आहे आणि मनात म्हणत आहे. पावसा तू असाच बरसत रहा,  माझ्या मनातल्या श्रावणाला फुलवत रहा. असं म्हणत ती नकळत पाऊस वाऱ्यात प्रेमाचा मोकळा श्वास घेत आहे तेव्हा या पावसाचा स्पर्श, तिला नकळत्या प्रियकराचा वाटत आहे. त्यामुळे आज पाऊसच तिचा सखा झाला आहे. आपण जर आता थोडे आलीकडे वळून पाहिले तर दिसेल आपल्याला एक युवक, तो या पावसात धुंद झालेला आहे.  झाडातून ज्या पाऊस धारा वर्षावत आहेत. त्या पाण्याचे तुषार त्याच्या अंगावर येत आहेत. ते सर्व थेंब जणू तिचे आहेत. असा आभास त्याच्या मनात तयार होतोय.  वाहणाऱ्या पावसाच्या झऱ्याप्रमाणे  त्याच्या मनात एक सखी झरु लागली आहे. अंबरीच्या घनात रुपेरी पाऊस जसा नेत्रसुखद होतो. तसे तिचे हास्य त्याला मोहीत करत आहे. असे धुंद करणारे वातावरण त्या दोहोंच्या मनात

पावसामुळे तयार झालेले आहे. असा हा पाऊस नवतरुणांना खुणावत जातो.

आपण आता थोडं कलत्या वयाकडे वळू या, जिथे वयाच उत्तरायण सुरू होतं तिथे. बघा त्या नानानानी पार्कच्या कट्ट्यावर, एक वयस्कर गृहस्थ आपल्या सहचारणी बरोबर बसलेले आहेत. ते दोघजण आपल्या बालपणीचा पाऊस न्याहाळत बसले आहेत. मग तो पाऊस वेंगुर्ल्याचा असो, अलिबागचा असो किंवा घाटमाथ्यावरील महाबळेश्वर, माथेरानचा असो, पाऊस कोणताही असो तो सर्वांसाठी एकसारखाच असतो. त्या पार्कमध्ये आता समवयाचे आणखी चार मित्र एकत्र येतात. मग पावसावरच्या गतकाळातील गप्पा सुरू होतात. आपल्या वेळी पाऊस खूप जास्त होता, दोन, दोन दिवस सूर्य दिसायचा नाही. पण तेव्हा पाऊस वेळच्या वेळी यायचा आणि जायचाही. परंतु हा आज कालचा पाऊस कधीही येतो, कधीही जातो, शहरात पाण्याच्या नद्या कधीही वाहू लागतात. म्हणजे पाऊस थोडा राजकारणी झाला आहे. वळवाचा पाऊसही मान्सूनचा वाटावा इतका पाऊस वेडा झाला आहे. ही वृक्षतोड, प्रदूषण यामुळे पावसाचा बोजवारा उडाला आहे. अशा या चाललेल्या संवादात कोणीतरी उगाच म्हणतो. अरे मित्रा त्यावेळच्या पावसात तुला ती भेटली होती, तिचं

काय झालं. असं बोलल्यावर पुढे मग आणखी थट्टा मस्करी सुरू होते. एक गृहस्थ मधूनच बोलू लागतात. कोणत्याही वयात प्रेम होतं. आताही तू एखाद्या तरुणीवर प्रेम करू शकतो. अर्थात आजोबा म्हणून तिच्यावर माया करावी लागेल. असं म्हटल्यावर सर्वजण खळखळून हसतात आणि म्हणतात. आपण एकत्र येतो, बसतो, बोलतो हेच आनंदाचे क्षण आपले आहेत. असंच आपण या पावसात, जीवनात सुखाने भिजत राहू. मग एके दिवशी वेळ येताच, या बरसणाऱ्या ढगात जाऊ. अशी ही त्यांची पावसाळी सांजसंध्या रंगलेली असते.

सकाळपासून चाललेली ही पावसाची रीप रीप अजूनही सुरू आहे. दुपार होऊन आता संध्याकाळची वेळ झाली आहे, तरी देखील पाऊस थांबलेला नाही. आता सर्व लोक पावसाची सैर करून आपल्या घराकडे परतत आहेत. पावसात भिजणारं ते लहान मुलं, आता आईकडे जाऊन केस पुसू लागलं आहे. पावसातील ती युवती आपल्या सुखद स्वप्नांना घेऊन घराकडे आली आहे. तो पावसातला युवक धुंद होऊन आपल्या आभासी प्रेमात रमत गमत आपल्या घरात चहा पीत बसला आहे. ते वयस्कर मित्र चहा पिऊन घरी निघत आहेत. यावेळी कुणाच्या मनात 'प्यार हुआ इकरार हुआ है' हे गाणं सुरू आहे, तर काहींच्या मनात 'ती गेली तेव्हा रिमझिम' हे

आईच्या आठवणीनं भरलेलं गाणं सुरू आहे. असा हा वेगवेगळ्या वयातील भावगहिरा पाऊस आहे. तो आपल्या सर्वांना मंत्रमुग्ध करतो. आनंद, उस्ताह चैतन्य देतो. अशा या पावसाची शब्दांकित सहल कशी वाटली. आपण आज देहाने पावसात जाऊ शकत नाही. पण मनाने नक्की जाऊ शकतो. त्यामुळे मनातून हा पाऊस एन्जॉय करा.

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या. साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धीआणि विकास नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820 (Whatsapp free books)